शुक्रवार, १५ जुलै २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३५८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग
कर्जत तालुक्याला वादळी पावसाचा तडाखा/२
नवी मुंबईत होणार फ्लेमिंगो बर्ड वॉच टॉवर/६
पोलादपुरातील मोरझोत धबधब्याचा रस्ता खचतोय/७

### मंकीपॉक्सच्या धोक्याबाबत केंद्राकडून राज्यांना गाईडलाईन्स



**नवी दिल्ली** : जगात मंकीपॉक्सचा वाढता धोका लक्षात घेता, गुरुवारी (दि. १४) केंद्रीय आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि आरोग्य सचिवांना पत्र लिहून आरोग्य मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याच्या सूचना केल्या आहेत. परदेशातून येणाऱ्या लोकांवर सतत लक्ष ठेवले जात आहे. काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशपासून केरळपर्यंत काही लोकांमध्ये मंकीपॉक्सची लक्षणे दिसून आली होती. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री वीणा जॉर्ज यांनी सांगितले की, रुग्णाचे नमुने गोळा करण्यात आले असून ते नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजीकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. डब्ल्यूएचओनुसार, मंकीपॉक्स हा प्राण्यांपासून मानवांमध्ये पसरणारा संसर्गजन्य रोग आहे आणि त्याची लक्षणे कांजन्यांच्या रुग्णांसारखीच असतात.

# इंधन दरकपातीने राज्यात दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. पेट्रोलचा दर पाच रुपयांनी तर डिझेलचा दर तीन रुपयांपर्यंत कमी करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. राज्य मंत्रीमंडळाची गुरुवारी (दि. १४) बैठक घेण्यात आली. या बैठकीत वेगवेगळी विकासकामे तसेच योजनांच्या अंमलबजावणीवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र पडणवीस यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केली.




केंद्र सरकारने ४ नोव्हेंबर २०२१ व २२ मे २०२२ रोजी पेट्रोल-डिझेलच्या दरात कपात केली होती. त्यांनी राज्य शासनालादेखील कर कमी करण्याचे आवाहन केले होते. काही राज्यांनी केंद्राच्या सूचना मान्य करून इंधनाचे दर कमी केले होते, मात्र महाराष्ट्रात इंधनाचे दर कमी करण्यात आले नव्हते. आपल्या युतीच्या सरकारने ठरवले आहे की, राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन जनतेच्या हिताचे निर्णय घेतले पाहिजेत. त्यामुळे पेट्रोलचे पाच रुपये तर डिझेलचे दर तीन रुपयांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे सामान्यांना दिलासा मिळणार आहे, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

(पान २ वर...)

## आणीबाणीतील बंदिवास सोसावा लागलेल्यांना पूर्वीप्रमाणेच मानधन

देशात आणीबाणीच्या काळात बंदिवास सोसावा लागलेल्या व्यक्तींना पूर्वीप्रमाणेच देण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

या योजनेंतर्गत १ ऑगस्ट २०२२पासून मानधन अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला. आणीबाणीच्या काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या व्यक्तींना दरमहा १० हजार रुपये व त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस, पतीस पाच हजार रुपये मानधन, तर एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या व्यक्तींना दरमहा पाच हजार रुपये तर त्यांच्या पश्चात दोन हजार ५०० रुपये इतके पूर्वीप्रमाणेच मानधन देण्यात येईल.

लॉकडाऊनमुळे ही योजना ३१ जुलै २०२० रोजी बंद करण्यात आली होती. योजना बंद झाल्याच्या कालावधीपासून थकबाकी देण्याससुद्धा मान्यता देण्यात आली. योजनेचा लाभ घेण्यासाठी नव्याने अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत आहे. यासाठी आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या व्यक्तींनी शपथपत्रासह अर्ज सादर करावयाचा आहे.

# द्रौपदी मुर्मू यांना महाराष्ट्रातून विक्रमी मते मिळतील

### एनडीएच्या नेत्यांचा विश्वास; मुंबईत जोरदार स्वागत

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना महाराष्ट्रातून एनडीएच्या मतांपेक्षाही अधिक मते मिळतील व विक्रमी मताधिक्य मिळेल, असा विश्वास गुरुवारी (दि. १४) मुंबईत एनडीएच्या ज्येष्ठ नेत्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी मतदार असलेल्या खासदार व आमदारांशी संवाद साधण्यासाठी मुर्मू आल्या होत्या. या वेळी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, केंद्रीय मंत्री नारायण राणे, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, डॉ. भारती पवार, भाजप राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे व सी. टी. रवी, मुंबई भाजप अध्यक्ष मंगलप्रभात



लोढा, आमदार आशिष शेलार व आमदार भारत गोगावले उपस्थित होते. शिवसेनेसह एनडीएचे घटकपक्ष, सहयोगी पक्ष व अपक्ष आमदार बैठकीस उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या पवित्र भूमीला माझा नमस्कार, अशी मराठीतून सुरुवात करून (पान २ वर...)

# आता सरपंच, नगराध्यक्षांची होणार थेट जनतेतून निवड

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी दिली पत्रकार परिषदेत माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

ग्रामपंचायतींचे सरपंच आणि नगर परिषद, नगरपालिकांच्या नगराध्यक्षांची निवड ही आता थेट जनतेतून होणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली.

उपमुख्यमंत्री फडणवीस या बैठकीत म्हणाले, देशातील सर्वच राज्यात सरपंचाची थेट जनतेतून निवड होते. त्यामुळे महाराष्ट्र सरपंच परिषदेतही राज्यातील ५० हजारांहून अधिक सरपंचांनी एकमुखाने सरपंचाची निवड थेट जनतेतून व्हावी, असे म्हटले आहे. त्यानुसारच हा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८च्या संबंधित कलमांमध्ये सुधारणा करण्यात



येणार असल्याचेही फडणवीस यांनी नमूद केले.

ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेच्या निवडणुकीत अनेक वेळा निवडून कोणीही आले तरी पैशाच्या जोरावर सरपंच किंवा नगराध्यक्षपद मिळवले जाते. त्यामुळे जो लायक उमेदवार आहे त्याला बाजूला केले जाते. यामुळे चांगल्या लोकांची संधी जाते व याचा परिणाम विकासकामांवर होतो. म्हणून थेट जनतेतून निवडीचा निर्णय घेण्यात आला असल्याचे या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## मिरा-भाईंदरचे १८ नगरसेवक शिंदे गटात

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदार प्रताप सरनाईक यांच्या नेतृत्वाखाली मिरा-भाईंदरमध्ये १८ नगरसेवकांनी एकनाथ शिंदे यांना समर्थन देत गुरुवारी (दि. १४) आपला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला पुन्हा एकदा धक्का बसला आहे.

या सर्व नगरसेवकांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत करून महाराष्ट्राच्या विकासाला हातभार लावण्याचे आवाहन केले.

## कर्जतचा लाचखोर भू-करमापक जाळ्यात

**कर्जत : बातमीदार**

कर्जत येथील भूमी अभिलेख कार्यालयात कार्यरत असलेले बालाजी राऊत यास लाचलुचपत विभागाने २५ हजारांची लाच स्विकारताना अटक केली आहे.

कळंब येथील जमिनीची मोजणी करण्याकरिता तक्रारदाराने कर्जत भूमी अभिलेख विभागातील अर्ज केला होता. या कार्यालयात भू-करमापक बालाजी रावसाहेब राऊत यांनी तक्रारदाराकडे दीड लाखांची मागणी केली. या संदर्भात तक्रारदाराने सोमवारी (दि. ११) अलिबाग येथील लाचलुचपत विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार लाचलुचपत विभागाने सापळा रचून बुधवारी (दि. १३) बालाजी रावसाहेब राऊत याला दीड लाखांपैकी २५ हजारांची लाच स्वीकारतांना रंगेहात पकडले.

## निवडक

### शिष्यवृत्ती परीक्षा पुढे ढकलली

**पुणे** : राज्य परीक्षा परिषदेतर्फे २० जुलैला होणारी ५वी आणि ८वीची शिष्यवृत्ती परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. अतिवृष्टीमुळे ही परीक्षा आता ३१ जुलैला घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २० जुलैच्या परीक्षेसाठीचे प्रवेशपत्रच ग्राह्य धरण्यात येईल. परीक्षा परिषदेच्या आयुक्त शैलजा दराडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

### आता झिका व्हायरसचा धोका

**मुंबई** : राज्यात आता झिका व्हायरसचे संकट आले आहे. वर्षभरानंतर पुन्हा झिका व्हायरसचा रुग्ण आढळला आहे. पालघर जिल्ह्यातील जोई येथील आश्रमशाळेतील ७ वर्षांच्या मुलीला झिकाची लागण झाली आहे. झिका विषाणूवर अद्याप औषध नाही, मात्र इनॲक्टिव्हेटेड व्हॅक्सिन विकसित करण्याचे आदेश जागतिक आरोग्य संघटनेने दिले आहेत.

## राज्यातील ९२ नगर परिषदा व चार नगरपंचायतींच्या निवडणुका स्थगित

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने राज्यात होऊ घातलेल्या ९२ नगर परिषदा व चार नगरपंचायतींच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव संजय सावंत यांनी गुरुवारी (दि. १४) एका पत्राद्वारे कळविले आहे.



या पत्रात नमूद केले आहे की, ८ जुलै रोजी राज्यातील १७ जिल्ह्यातील ९२ नगर परिषदा व चार नगरपंचायत पंचायतीच्या सदस्य पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता, मात्र सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली होती व १२ जुलै रोजी त्याची सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भातील पुढील सुनावणी १९ जुलै रोजी ठेवलेली आहे. या पार्श्वभूमीच्या अनुषंगाने ८ जुलै रोजीच्या आदेशान्वये देण्यात आलेला राज्यातील ९२ नगर परिषदा व चार नगरपंचायतीमधील सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम स्थगित करण्यात आला आहे. या निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम यथावकाश देण्यात येईल, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# राज्यात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती

### रायगडातील नद्यांनी ओलांडली धोक्याची पातळी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्यात पावसाचा जोर कायम असून अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र सर्वदूर कमी-अधिक प्रमाणात पाऊस होत असून, या विभागात आणखी दोन दिवस मुसळधारांची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

पालघर, रायगड, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापुरात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगडातील महाड तालुक्यातील सावित्री नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने बुधवारी नदीचे पाणी आले होते.

(पान २ वर...)



### पेणमध्ये घरांच्या भिंती कोसळल्या

पेण शहरातील एसटी स्थानक, कोळीवाडा, चिंचपाडा, विठ्ठलआळी, कारमेल स्कुल, महाडिकवाडी, पामबीच रोडसह तालुक्यातील अंतोरे, खरोशी, तांबडशेत आदी गावांमध्ये पाणी शिरले असून अनेक ठिकाणी घरांच्या भिंती कोसळून नुकसान झाले आहे.

### कोरे मार्गावर आला मातीचा भराव

कोकण रेल्वेमार्गावर मातीचा भराव आल्याने मुंबई-मडगाव-मांडवी एक्स्प्रेस खोळंबली होती. त्यामुळे खेड रेल्वेस्थानकावर पुढील सूचना मिळेपर्यंत तिकीट विक्री थांबविण्यात आली. यामुळे मोठ्या संख्येने नागरिकांची गैरसोय झाली.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींवरील हल्ल्याचा कट उधळला

### माजी पोलीस अधिकाऱ्यासह दोघांना अटक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ल्याचा कट बिहार पोलिसांनी उधळला आहे. पाटण्यात केलेल्या कारवाईत दोन दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. यातील एक जण माजी पोलीस अधिकारी असल्याचे समोर आले.

या कटानुसार भारताला २०४७पर्यंत इस्लामिक राष्ट्र बनवण्याचा कट रचला जात होता. याचाच भाग म्हणून पंतप्रधान मोदींना १२ जुलैच्या दौऱ्यात लक्ष्य करण्याच्या कटाचाही समावेश होता. अटक केलेल्या दोन दहशतवाद्यांची नावे अथर परवेज व मोहम्मद जलालुद्दीन अशी आहेत.

पंतप्रधान मोदींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर संशयित दहशतवाद्यांचे १५ दिवसांचे प्रशिक्षण फुलवारी शरिफ येथे झाले. त्यांनी ६ व ७ जुलैला पंतप्रधान मोदींवर हल्ला करण्याचा कट रचण्यासाठी बैठक घेतली. याची माहिती गुप्तचर विभागाला मिळाल्यानंतर पोलिसांनी ११ जुलैला फुलवारी शरिफ येथे धाड टाकली. या वेळी पोलिसांना घटनास्थळावरून काही कागदपत्रे मिळाली. यात '२०४७पर्यंत भारत एक इस्लामिक राष्ट्र' नावाचे कागदपत्र सापडले. याशिवाय २५ पीएफआय पॅम्प्लेटही हस्तगत करण्यात आले. या प्रकरणातील गंभीर बाब म्हणजे, अटक केलेल्या आरोपींपैकी एक जण माजी पोलीस अधिकारी आहे.

आरोपी मोहम्मद जलालुद्दीन झारखंड पोलीस विभागातील माजी अधिकारी आहे. या आरोपींचा पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या कट्टरतावादी संघटनेशी संबंध आहे. जलालुद्दीन याआधी स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया या कट्टरतावादी संघटनेशीही संबंध राहिला आहे. फुलवारी शरिफचे सहाय्यक पोलीस अधीक्षक मनिष कुमार यांनी याबाबत माहिती दिली.

# माजी उपराष्ट्रपती हमीद अन्सारींच्या कारकिर्दीची चौकशी व्हावी

### आमदार प्रशांत ठाकूर यांची केंद्र सरकारकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

काँग्रेसने आपल्या सत्ताकाळात देशाच्या उपराष्ट्रपतीपदावर बसविलेले हमीद अन्सारी यांच्याविषयी पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या नुसरत मिर्झा या महिला पत्रकाराने केलेला गौप्यस्फोट गंभीर असून त्याचा देशाच्या सुरक्षिततेशी संबंध असल्याने अन्सारी यांच्या कार्यकाळाची आणि पाकिस्तानी हेराने दिलेल्या माहितीची संपूर्ण चौकशी करावी, अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे. अन्सारी यांच्यावरील वादग्रस्त आरोपांवर काँग्रेसनेही आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे, असे ते म्हणाले.

सन २००७ ते २०१७ या काळात हमीद अन्सारी हे देशाचे उपराष्ट्रपती होते. याच काळात त्यांच्या निमंत्रणावरून भारतात पत्रकार या नात्याने दौरे करताना भारतातील महत्त्वाची गोपनीय माहिती हमीद अन्सारी यांच्याकडून



मिळविल्याचा गंभीर गौप्यस्फोट नुसरत मिर्झा या पाकिस्तानी गुप्तहेर महिलेने केला आहे. एकदा दोनदा नव्हे, तर तब्बल पाच वेळा अन्सारी यांनी वेगवेगळ्या निमित्ताने मिर्झा यांना भारतात निमंत्रित केले होते. या भेटीत मिळविलेली माहिती आपण आयएसआय या पाकिस्तानी गुप्तचर एजन्सीला पुरवत होतो, असे मिर्झा यांनी म्हटले आहे. भारताच्या प्रत्येक शहरात पाकिस्तानी गुप्तहेरांचे जाळे पसरले असल्याचेही मिर्झा यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे. त्यामुळे, मिर्झा आणि हमीद अन्सारी यांच्यातील संबंधांचा खुलासा होणे जरूरीचे असून त्यासाठी अन्सारी यांची चौकशी केली जावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. इराणचे राजदूत म्हणूनदेखील अन्सारी यांची कारकिर्द संशयास्पद असल्याचा आरोप केला जात असून देशाच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड न करता या आरोपांची तातडीने चौकशी होणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

देशाच्या सुरक्षिततेस बाधा येऊ शकेल, अशी माहिती शत्रूराष्ट्रास पुरविण्याचा आरोप घटनात्मक पदावरील व्यक्तीवर होणे ही चिंताजनक बाब असल्याने अन्सारी यांच्या संपूर्ण कारकिर्दीची चौकशी करून केंद्र सरकारने सत्य उजेडात आणले पाहिजे. तसेच त्या वेळी केंद्रात सत्तेवर असलेल्या काँग्रेसने अन्सारी यांच्या नेमणुकीमागील भूमिका स्पष्ट केली पाहिजे, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

# मुंबई-अहमदाबाद महामार्ग पुरामुळे ठप्प

**कासा : प्रतिनिधी**

मुंबई- अहमदाबाद महामार्गावरील पूर्णा नदीला पूर आल्यामुळे महाराष्ट्र व गुजरात बॉर्डरवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. वलसाड जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग पाण्याखाली गेला असून दोन्ही बाजूंनी वाहनांच्या १८ ते २० किमीच्या रांगा लागल्या होत्या.

सध्या जोरदार अतिवृष्टीमुळे सर्वत्र जलमय झाले असून महामार्गावरून अहमदाबादकडे जाणारे तसेच गुजरातहून मुंबईकडे जाणाऱ्या वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

गुजरात राज्यातील वलसाड जिल्ह्यातील चिखली नवसारी पुलावरून पाणी वाहत असल्याने मुंबई अहमदाबादमार्गे गुजरातकडे जाणारी वाहने थांबवून ठेवली आहेत. अच्छाड जकात नाका सीमेच्या पुढे महाराष्ट्र सीमेवर वाहने थांबवून ठेवण्यात आली. या मार्गांवर पोलीस बंदोबस्त तैनात ठेवला आहे. त्यामुळे महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



# कर्जत तालुक्याला वादळी पावसाचा तडाखा


## निवडक

### पनवेलमधून रिक्षा चोरीस

**पनवेल :** शहरातील दत्तइन हॉटेलच्या बाजूला असलेल्या फुलाच्या दुकानाजवळ मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. विजय वाहुलकर यांची ८० हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची (एमएच ४६-बीडी ५३०४) रिक्षा दत्तइन हॉटेलच्या बाजूला असलेल्या फुलाच्या दुकानाजवळ मोकळ्या जागेत उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने ही रिक्षा चोरून नेल्याने या बाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

### उसर्ली गावातील मुलाचे अपहरण

**पनवेल :** एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलाचे अपहरण झाल्याची घटना पनवेल जवळील उसर्ली गाव येथे घडली आहे. राहुलकुमार सुधीर मंडल असे त्याचे नाव असून त्याची उंची अंदाजे चार फूट, अंगाने सडपातळ, रंग काळा, चेहरा गोल, नाक छोटे पसरट, डोळे काळे, केस लहान, दोन्ही पाय वाकडे असून अंगात लाल टीशर्ट व निळी हाफ पँट घातलेली आहे. त्याला हिंदी भाषा अवगत आहे. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### शेडुंग येथे लोखंडी अँगलची चोरी

**पनवेल :** दहा हजार रुपये किमतीच्या १० लोखंडी अँगलची चोरी झाल्याची घटना तालुक्यातील शेडुंग येथील सुधीर शेट्टीफार्म येथे घडली आहे. निकेश पालकर हे देखभाल करीत असलेल्या सुधीर शेट्टीफार्म हाऊसच्या सुरक्षेसाठी दगडी भिंतीवर लावलेले १० लोखंडी अँगलची (किमती १० हजार रुपये) चोरी झाली आहे. याबाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ▌विजेचे खांब कोसळले, वीज रोहित्रांना फटका

**कर्जत : बातमीदार**

सतत सुरू असलेल्या वादळी वाऱ्यामुळे कर्जत तालुक्यातील वीज पुरवठा खंडित झाला आहे. वादळी वाऱ्यामुळे तालुक्यातील तीन ठिकाणचे वीज रोहित्र जळून नादुरुस्त झाले आहेत. तसेच वीजप्रवाह वाहून नेणारे खांब कोसळले आहेत. दरम्यान, महावितरणकडून स्थिती पूर्ववत करण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. खंडित वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरण कडून सर्व अधिकारीवर्ग फिल्डवर काम करताना दिसत आहे. तालुक्यातील कोल्हारे ग्रा. पं. च्या हद्दीत असलेल्या पूजा रिसॉर्टमध्ये उल्हास नदीला आलेल्या महापुराचे पाणी शिरले आणि मोठे आर्थिक नुकसान झाले.



कर्जत तालुक्यात गेले पाच दिवस मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यात गेले काही दिवस पावसासोबत वादळी वारा देखील वाहत आहे. या वादळी वाऱ्यामध्ये महावितरणचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्यात तीन ठिकाणी वीजपुरवठा करणारे वीज रोहित्र जळून गेले आहेत. सोसाट्याच्या वाऱ्यासह येत असलेल्या पावसामुळे तालुक्यात नेरळ आणि कडाव परिसरात महावितरणचे मोठे नुकसान केले आहे. नेरळ उपकेंद्र अंतर्गत येत असलेले बोपेले येथील फिडर बंद पडले असल्याने त्या परिसरातील ३०पेक्षा जास्त गावांचा वीज पुरवठा खंडित झाला आहे. तसेच याच भागातील कोल्हारे साई मंदिर येथील २०० केव्हीए क्षमतेचे तसेच कोल्हारे गावातील ६३ केव्हीए क्षमतेचे वीज रोहित्रामध्ये बिघाड झाला आहे. कळंबोली येथे महावितरणचे कर्जत तालुक्याचे मुख्य सब स्टेशन आहे. या ठिकाणी वीज पोहचविणारे एलटी वीज प्रवाहाचे तीन खांब कोसळले आहेत. तर कुंभे येथील एक, माणगाव येथील एक, बोपले येथील दोन, शेलू जवळील बंधीवली येथे तीन, भानसोली येथे एक, नेरळ निर्माणनगरी येथे एक वीज वाहक खांब यांचे नुकसान वादळाने केले आहे. भानसोळी येथील वीजवाहक यंत्रणा देखील नादुरुस्त झाली आहे. वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणचे सहाय्यक अभियंता गणेश देवके यांच्या मदतीला कर्जत तालुक्यातील सर्व शाखा अभियंते फिल्डवर आहेत. नेरळ येथील कोमळवाडी येथे पाच खांब कोसळले असल्याने नेरळ येथील दोन्ही शाखा अभियंता त्या मोहिमेवर आहेत. माथेरानला खालून वीज पुरवठा होत असल्याने माथेरान येथील शाखा अभियंता संतोष पादीर हे आपत्ती व्यवस्थापन काळात कळंबोली सब स्टेशन येथे मोहिमेवर आहेत. दरम्यान सायंकाळपर्यंत नेरळ भागाचा वीज पुरवठा पूर्ववत करण्याचा महावितरणच्या अधिकाऱ्यांचा प्रयत्न सुरू होता. तर जळालेले वीज रोहित्र पनवेलयेथून बदलून आणण्याची कार्यवाहीदेखील तत्काळ युद्ध पातळीवर सुरू होती.

दरम्यान, उल्हास नदीच्या कडेला वाकस पुलाच्या अलीकडे कोल्हारे ग्रा. पं.च्या हद्दीत पूजा रिसॉर्ट आहे. यामध्ये पाणी आले. प्रशस्त आणि आकर्षक स्टाईलसाठी प्रसिद्ध असलेल्या या रिसॉर्टमध्ये मागील वर्षी उल्हास नदीला महापूर आल्यानंतर पाणी शिरले होते. त्यावेळी देखील लाखोंचे नुकसान झाले होते. मात्र त्यातून देखील उभारी घेत रिसॉर्ट मालक यांनी रिसॉर्ट पुन्हा नव्या दिमाखात उभे केले होते. त्यात रिसॉर्ट मालक हे अश्वप्रेमी असल्याने पर्यटकांसाठी मोठ्या प्रमाणात हॉर्स रायडिंगसाठी घोडे पुरविले जातात. त्यामुळे १३जुलै रोजी सकाळी उल्हास नदीचे पाणी वाढू लागल्याने तेथे असलेल्या सर्व घोड्यांना सुरक्षित ठिकाणी हलविले. पूर्वीचा अनुभव पाहता पाणी आणखी वाढणार नाही असे वाटत असताना पाण्याचा वेग प्रचंड असल्याने शेवटी हॉटेल व्यवस्थापन यांनी तेथे पर्यटनासाठी आलेल्या सर्व पर्यटकांना सुरक्षित ठिकाणी हलविले. हॉटेलच्या तळमजल्यावर असलेले किमती साहित्य वरच्या मजल्यावर हलवण्याचा प्रयत्न केला. मात्र पाण्याचा दाब एवढा प्रचंड होता की, काही मिनिटात हॉटेलच्या तळमजल्यावर असलेल्या ३० खोल्यांमध्ये पुराचे लाल चिखल मातीचे पाणी शिरले. तसेच परिसरातून किमान चार फूट पाणी वाहत होते.

### शेलू गावात घर कोसळून नुकसान

कर्जत तालुक्यातील शेलू गावातील चाळीमध्ये राहणारे कुटुंबीय यांना उल्हास नदीला आलेल्या महापुराचा फटका बसला आहे. त्यात तेथील आदिवासी वस्तीमधील अशोक वाघमारे यांचे राहते घर वादळात कोसळले असून त्यांचा संसार उघड्यावर आला आहे. तसेच त्या घरातील सर्व साहित्य पावसाच्या पाण्यात भिजले. दरम्यान, स्थानिक कार्यकर्ते नरेश मसणे, रवी मसणे यांनी मदत केली असून त्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक आधार मिळाला पाहिजे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



# नेरुळमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याची भाजपची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरुळ विभागातील शिरवणे, सारसोले, नेरुळ क्षेत्र २मधील एन एल टाईप परिसरात सातत्याने मागील काही दिवसांपासून पाण्याची समस्या भेडसावत आहे. अपुऱ्या आणि कमी वेळ, कमी दाबाने होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. दरम्यान, याबाबत नेरुळमधील भाजपचे स्थानिक नगरसेवक गिरीश म्हात्रे यांनी मनपा शहर अभियंता संजय देसाई यांची भेट घेऊन नेरुळमध्ये पुरेसा पाणीपुरवठा त्वरीत सुरू करावा अशी मागणी केली आहे.



नेरुळमधील शिरवणेमधील हनुमान मंदिर, पवार आळी, गावदेवी परिसर नेरुळ सेक्टर एक मधील एनएल दोन, एनएल चार मधील पंचशील अपार्टमेंट, नीलम, निसर्गमधील रहिवाशांना अपुऱ्या पाण्याचा त्रास सतत भेडसावत असल्याचे भाजपच्या स्थानिल नगरसेविका माधुरी सुतार यांनी सांगितले. नेरुळ क्षेत्र दोन एनएल सहामधील दुसऱ्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावरील नागरिकांना कमी दाबाने पाणी येत असल्याचे भाजपचे गणेश रसाळ यांनी या दरम्यान बोलताना सांगितले.

नेरुळ गावामधील पाणी पुरवठा टाकी पूर्णक्षमतेने भरत नसल्याने ऐन पावसाळ्यात मागील महिना भरापासून तीव्र पाणीटंचाईला ग्रामस्थ आणि गावठानमधील नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. नेरुळ गावास पाणीपुरवठा करणारी बालाजी टेकडीवर असलेली पाणीटाकी फक्त एक मीटर भरते. या मुळे मुबलक पाणी पुरवठा होणार कसा असा सवाल स्थानिक माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे यांनी मुख्य शहर अभियंता संजय देसाई यांची भेट घेऊन उपस्थित केला. म्हात्रे यांनी याबाबत एक निवेदन देऊन नेरुळमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी देसाई यांच्याकडे केली. शहर अभियंत्यांनी संबंधित पाणी पुरवठा अधिकारी यांना सूचना करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासंबंधी आदेश दिले. यावेळी भाजपचे माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे, गणपत बुवा भोपी, देवनाथ म्हात्रे, अक्षय पाटील, एम एन पाटील, वनराज म्हात्रे, चंद्रवदन म्हात्रे, नारायण भोईर, भालचंद्र म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे, कुमार पाटील, संदेश गायकवाड सहयोग म्हात्रे, आशिष म्हात्रे, साई म्हात्रे, आशिष कडू आदी उपस्थित होते.




## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

### पनवेल महानगरपालिका हद्दीत शुक्रवार, दि. १५ जुलै २०२२ रोजी होणारे

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**


## पान १ वरून

### इंधन दर कपातीने राज्यात दिलासा

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बहुमत चाचणीच्या दिवशीच इंधन दर कपात करणार असल्याची घोषणा केली होती. त्यावर गुरुवारी निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे राज्याच्या तिजोरीवर सहा हजार कोटींचा अतिरिक्त भार पडणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत घेतलेल्या पत्रकार परिषदेत एकनाथ शिंदे यांनी इंधनदर कपात केल्याचे म्हटले. या वेळी फडणवीस याांनी आणीबाणीच्या काळात कारागृहात गेलेल्या लोकांसाठीची पेन्शन योजना पुन्हा सुरू करणार असल्याचेही म्हटले. महाविकास आघाडी सरकारने कोरोना काळातील आर्थिक अडचणीचे कारण देत ही पेन्शन योजना बंद केली होती.

### मुंबईत द्रौपदी मुर्मू यांचे जल्लोषात स्वागत

द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, देशाला गौरन्वित करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबडकरांसारख्या महान व्यक्ती या राज्यात झाल्या. उद्योग, व्यापार, शिक्षण, कृषी अशा सर्व क्षेत्रात महाराष्ट्राने प्रगती केली आहे. राज्यातील आमदार, खासदारांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल आपण आभारी आहोत.

मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, भाजपच्या संसदीय मंडळाने देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांत राष्ट्रपतीपदाचा मान आदिवासी समाजातील महिलेला देण्याचे ठरविले व द्रौपदी मुर्मू यांची एकमताने निवड केली. त्यांच्या रुपाने प्रथमच एक आदिवासी महिला राष्ट्रपती होणार आहे. त्यांना महाराष्ट्रातून अपेक्षेपेक्षा जास्त मते मिळतील.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामान्य घरातील एका कर्तबगार महिलेला सर्वोच्च पदावर बसण्याची संधी दिली आहे, त्याबद्दल मोदीजींचे अभिनंदन. मुर्मू यांना राज्यात विक्रमी मते मिळतील. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांत प्रथमच आदिवासी राष्ट्रपती मिळणे हे सौभाग्य आहे. ही नव्या युगाची सुरुवात आहे. या निवडणुकीत एनडीएचे खासदार, आमदार मते देतीलच, पण येथे नसलेले अनेक जण मतदान करतील व मुर्मू यांना विक्रमी मते मिळतील.

द्रौपदी मुर्मू यांचे स्वागत करताना चंद्रकांत पाटील म्हणाले की, श्रीमती मुर्मू या कर्तबगार असून त्यांना मतदान करताना राज्यातील आमदार, खासदारांना अभिमान वाटेल. विनोद तावडे यांनी मुर्मू यांचा परिचय करून दिला व निवडणूक प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले. आशिष शेलार यांनी सूत्रसंचालन केले तर मंगलप्रभात लोढा यांनी आभार मानले.

### राज्यात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती

कोकणात रत्नागिरीमध्ये पावसाचा जोर कमी असला तरी रायगडमध्ये मुसळधार पाऊस झाला. रायगडमध्ये गुरुवारी सकाळी पावसाचा जोर पुन्हा वाढल्याने कुंडलिका, अंबा, पाताळगंगा नद्यांनी इशारा पातळी ओलांडली. त्यामुळे रोहा, नागोठणे आणि आपटा परिसराला सतर्कतेचा इशारा देण्यात आला. अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाण जनजीवन विस्कळीत झाले. महाड तालुक्यातील सावित्री, काळ, आणि गांधारी या नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्याने सावित्री नदीचे पाणी दस्तुरी नाका ते नातेखिंड या मार्गावर येताच एकच धावपळ उडाली. भोईघाट येथे स्वयंचलित पाणी पातळी मोजणी बसवल्याने ठराविक अंतराने आपत्कालीन कक्षाकडून नागरिकांना कळवले जात आहे.

### नागोठण्यात सहा जणांना वाचविले

***अंबा नदीने बुधवारी सायंकाळी जोरदार पावसामुळे धोक्याची पातळी ओलांडल्यामुळे जागोजागी पूर परिस्थिती निर्माण झाली होती. ग्रामीण भागातदेखील काही भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. पळस येथे मासेमारी करण्यासाठी गेलेले सहा तरुण पुराच्या पाण्यात अडकून पडले होते. या तरुणांना वाचवण्यात पोलीस प्रशासनाला व रेस्क्यू टीमला यश आले आहे.***

## लोकमान्य को. ऑप. सोसायटीची अर्थपूर्ती ठेव योजना जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२०२१-२०२२ च्या आर्थिक वर्षात लोकमान्य मल्टिपर्पज कॉ. ऑप. सोसायटीच्या विविध योजनांना मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादाने लोकमान्य मल्टिपर्पज को. ऑप. सोसायटीने उज्वल भविष्याची गुंतवणूक संपन्नतेची आणि मनासारख्या लाभाची मुदत ठेव योजना लोकमान्य अर्थपूर्ती ठेव योजना आपल्या सभासदांसाठी सुरु केली आहे.

ही योजना ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत कार्यान्वित राहील. १८ महिन्याच्या गुंतवणुकीवर नऊ टक्के असा आकर्षक व्याजदर या योजनेत आहे. सभासद किमान रुपये दहा हजार किंवा त्यावर एक हजाराच्या पटीत कितीही रक्कम या योजनेत गुंतवू शकतील. ज्येष्ठ नागरिकांसाठी व एक पावती रुपये दहा लाख किंवा अधिक ठेव गुंतवणुकीवरसुद्धा अर्धा टक्का व्याज अधिक मिळण्याची सोय या योजनेत आहे. योजनेत सभासद ज्येष्ठ नागरिक किंवा एक पावती दहा लाख ठेव धारक या दोन्ही पैकी एकच अधिक व्याजदराचा लाभ घेऊ शकतील. नियम व अटींवर लोकमान्य अर्थपुर्ती ठेव योजनेत मुदतपूर्व ठेव काढणेची सोय किंवा मुदत ठेवीवर ९० टक्के पर्यंत कर्ज मिळू शकते. माहितीसाठी लोकमान्य मल्टिपर्पज को.ऑ.सोसायटीच्या नजीकच्या शाखेत भेट द्यावी.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्रीमती जयश्री दगडू दळवी** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**मौजे - कोयनावेळे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| गट नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३२/११ | ०-६४-५०<br>पो.ख. ०-०२-३०<br>**एकूण ०-६६-८०** | ४.८७ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधित व्यक्ती, सरकारी/निमसरकारी/खाजगी संस्था यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १४/०७/२०२२.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादीप अपार्टमेंट,
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. २७४५६३०६

## महाराष्ट्र शासन

### महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

## निविदा सूचना क्रमांक ३२ सन २०२२-२०२३

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बोर्ली पंचतन येथील गणेश मंदिर सभागृहाचे बांधकाम करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पर्यटन) | ५०२६९७५ | ५१००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २. | बोर्ली पंचतन येथील तलावाचे बांधकाम करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पर्यटन) | ८३१४३८४ | ८४००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ३. | देवखेल येथील कुसुमेश्वर मंदिर परिसर विकास करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पर्यटन) | ७५९५०८६ | ७६००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ४. | दिवेआगर येथे सिद्धनाथ भैरव मंदिर सभामंडप बांधणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पर्यटन) | ५२५६५५६ | ५३००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ५. | दिवेआगर येथे केदारलिंग भैरव मंदिर सभामंडप बांधणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पर्यटन) | ५२५६५५६ | ५३००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार अ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक (द्वितीय सूचना)**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **१५/०७/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **२९/०७/२०२२** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक **०२/०८/२०२२** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३१९९**
**दिनांक : १२/०७/२०२२**

### बंदरांमध्ये धोक्याचा तीन नंबरचा बावटा लावला

# उरणमधील सागरी वाहतूक बंद

## ■ गेटवे-एलिफंटा, मोरा-भाऊचा धक्का, जेएनपीए प्रवासी लाँच सेवा ठप्प



**उरण : प्रतिनिधी**

विविध बंदरात धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा लावण्यात आला आहे. त्यामुळे गेटवे-एलिफंटा, गेटवे-जेएनपीए, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या मार्गावरील सागरी वाहतूक बंद करण्यात आली आहे. धोक्याच्या इशाऱ्यानंतर या सागरी मार्गावरील प्रवासी, पर्यटक वाहतूक कोलमडली असल्याची माहिती बंदर अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

खराब हवामान आणि पावसाचा फटका येथील सागरी प्रवासी वाहतुकीलाही मोठ्या प्रमाणावर बसला आहे. त्यातच बंदरात धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा काल संध्याकाळी लावण्यात आला आहे. त्यामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून गेटवे ऑफ इंडिया-एलिफंटा दरम्यानची लाँचसेवा बंद करण्यात आली आहे. लाँचसेवा बंद करण्यात आल्याने पर्यटक वाहतूक ठप्प झाली असल्याचे घारापुरी बंदर विभागाचे अधिकारी विनायक करंजे यांनी दिली. गेटवे ऑफ इंडिया येथुन जेएनपीए बंदराकडे प्रवाशांना घेऊन जाणारी सागरी सेवाही मंगळवारी सायंकाळपासून बंद करण्यात आली आहे.

भाऊचा धक्का ते मोरा या सागरी मार्गावरूनही प्रवासी वाहतूक बंद करण्यात आली आहे. या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक कालपासूनच कोलमडली असल्याची माहिती मोरा बंदर विभागाचे अधिकारी प्रकाश कांदळकर यांनी दिली आहे.

करंजा- रेवस दरम्यानची तरसेवाही कालपासूनच बंद करण्यात आली आहे. वादळी, खराब हवामानामुळे स्थानिक मासेमारीवरही विपरीत परिणाम झाला आहे. धोक्याच्या इशाऱ्यानंतर स्थानिक मासळी बाजारात मासळी मिळेनाशी झाली आहे. त्यामुळे मासळी खवय्यांचे हाल झाले आहेत.

विविध सागरी मार्गावरील पर्यटक, प्रवासी सेवा खंडित झाल्याने या सागरी मार्गावरुन दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवासी, पर्यटकांची गैरसोय झाली आहे.



**पनवेल : महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी खारघर येथील साई बाबा मंदिर आणि पनवेल येथील गावदेवीपाडा येथील स्वामी समर्थ मठात जाऊन बुधवारी दर्शन घेतले. दरम्यान, सभागृह नेते परेश ठाकूर यांना गुरुस्थानी मानणाऱ्या अनेकांनी त्यांची भेट घेऊन गुरुपार्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, युवा नेते समीर कदम, केदार भगत, प्रशांत लांडगे, जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष मयुरेश नेटकर, शहर अध्यक्ष रोहित जगताप, आकाश भाटी, तेजस जाधव, स्वामीसेवक संजय कदम, महेश सुतार, ओक काका आदी उपस्थित होते.**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कौशल्य विकास कक्ष व वोकस्कील संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवारी (दि. १४) कौशल्य विकास व गिग अर्थव्यवस्थेवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



यामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या आवडीच्या कार्यक्षेत्रामध्ये अत्यावश्यक वाटणाऱ्या सर्व कौशल्याची यादी प्रस्तुत केली. भारताच्या अर्थव्यवस्थेवर त्यांचा सहभाग कोणत्या स्तरावर आहे. याचे डेमोग्राफिक डिव्डिडेंटद्वारे महत्त्व पटवून दिले.

वोकस्कील संस्थेच्या अध्यक्ष डॉ. आरती अग्रवाल व रिजवाना कदमतोडे या प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होत्या. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रा. सफिना मुकादम यांनी केले. तसेच कौशल्य विकास कक्षच्या अध्यक्ष रूपाली नागरेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## वायरमन व लाईनमनची रिक्त पदे तातडीने भरा

### आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने कोन, भिंगार, वारदोली या ग्रामपंचायत विभागातील वायरमन व लाईनमन यांची रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, अशी मागणी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे केली आहे.

या संदर्भातील निवेदन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता शिवाजी वायतळकर, उप कार्य अभियंता एम. बी. राख, श्री. झिल्लारे यांच्याकडे भिंगार ग्रामपंचातीचे माजी सरपंच योगेश लहाने, महेश लहाने, नरेश लहाने, सुधीर लहाने यांनी सुपूर्द केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल तालुक्यातील कोन, भिंगार, वारदोली या ग्रामपंचायत हद्दीतील भिंगारवाडी, भिंगार, शेडूंग, भेरले, बारदोली, बेलवली, ठाकूरवाडी, सांगडे, बोर्ले, अजिवली, कोन या गावांमध्ये विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने गेल्या दिड ते दोन महिन्यांपासून वायरमन व लाईनमन ही दोन्ही पदे रिक्त असल्यामुळे सध्याच्या मुसळधार पडत असलेल्या पावसाची परिस्थिती पाहता नागरिकांना विद्युत संदर्भातील अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्या अनुषंगाने विभागातील ग्रामस्थांनी विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे प्रत्यक्ष बाब निदर्शनास आणून सुद्धा अद्यापपर्यंत ही पदे रिक्त आहेत.



या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता आणि विभागात सध्या पावसाळयाची परिस्थिती पाहता तातडीने वायरमन व लाईनमनची रिक्त पदे भरण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही व्हावी, असे या निवेदनात म्हटले आहे.

## वाकडी गावात घरफोडी

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील वाकडी गावच्या हद्दीत अज्ञात व्यक्तीने बंद घराचे लॉक उघडून घरामध्ये असलेले जवळपास एक लाख ४० हजार रुपये किमतीचे दागिने चोरल्याची घटना घडली आहे.

वाकडी येथील ग्रीन एकर सोसायटीमध्ये राहणारे मुकेश पांचाळ यांचे घर बंद असताना व त्यांनी घराच्या चाव्या सोसायटीमधील एका ओळखीच्या घरात दिल्या होत्या. दरम्यान, अज्ञात व्यक्तीने बंद घराचे लॉक उघडून घरामध्ये असलेले जवळपास एक लाख ४० हजार रुपये किमतीचे दागिने चोरल्याने याबाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.





**पनवेल : गुरुपौर्णिमेनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांचे गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, युवा नेते किशोर पाटील यांनी आशीर्वाद घेतले.**

## पनवेल इनरव्हिल क्लबचा पदग्रहण समारंभ उत्साहात

### ■ आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हिल क्लब, पनवेलचा पदग्रहण समारंभ बुधवारी (दि. १३) तथास्तु हॉल येथे मोठ्या उत्साहात झाला. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, पेण येथील अहिल्या महिला मंडळाच्या अध्यक्ष अश्विनी गाडगीळ, वर्षा ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

पदग्रहण समारंभाची सुरुवात दिपप्रज्वलनाने व डॉ. अर्चना मेश्राम यांनी गायलेल्या गणेशवंदनेने झाली. सन २०२१-२२च्या अध्यक्षा यांनी पदभार नुतन अध्यक्षांकडे सोपवण्यापूर्वी आपले मनोगत व त्यांनी वर्षभरात केलेल्या महत्त्वाच्या उपक्रमांचा आढावा पीपीटीद्वारे घेतला. यानंतर नुतन अध्यक्षा संजिवनी मालवणकर यांनी मावळत्या अध्यक्ष सुलभा निंबाळकर यांच्याकडून सन २०२२-२३ ह्या वर्षाकरीता अध्यक्षपदाची सुत्रे, कॉलर, पीन व क्लबचे चार्टर स्विकारले.

नुतन अध्यक्ष संजिवनी मालवणकर यांनी २०२२-२३च्या कार्यकारिणीची ओळख करून दिली व सचिव स्वाती घांग्रेकर, खजिनदार शुभांगी पिंपळकर, आय.एस.ओ. वंदना लघाटे, संपादिका डॉ. वीणा मनोहर व सी. सी. सुलभा जोशी यांनीही पीन्स व आपआपला पदभार स्विकारला.



नुतन अध्यक्षा संजिवनी मालवणकर यांनी आपले मनोगत सादर केले व २०२२-२३ चे इनरव्हिलचे घोषवाक्य वर्क वंडर्सनुसार अनेक लोकोपयोगी कामे करणार असल्याचे सांगितले. १ जुलै रोजी त्यांचा कार्यकाल सुरू झाल्या दिवशीच त्यांनी पनवेलमधील १३ दंतवैद्यांना सन्मानित केले. १३ जुलै रोजी जुन्या भाजीमार्केटजवळ सोलरउर्जे वर चालणारे मोबाइल चार्जिंग स्टेशन उभारून भाजीविक्रेते व कामगार यांचे आशिर्वाद घेतले. तसेच कार्यक्रमात आमदार प्रशांतजी ठाकूर यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्या अश्विनी गाडगीळ यांच्या अहिल्या महिला मंडळाला पाच हजार रुपयांचा धनादेश दिला आणि पनवेल कुरुळकर विशेषमुलांच्या वसतीगृहाला धान्याची मदत करून आपल्या कार्याची दमदार सुरुवात केली.

आमदार प्रशांतजी ठाकूर यांनी नुतन अध्यक्ष संजिवनी मालवणकर यांना उत्तम कार्य करण्यासाठी शुभेच्छा देऊन त्यांच्या उत्साहाचे कौतुकही केले. इनरव्हिल डिस्ट्रिक्ट ३१३च्या चेअरमन मुक्ती पानसे यांची व त्यांच्या कामाची ओळख डि.इ.एस.ओ. डॉ. शोभना पालेकर यांनी करून दिली.

इनरव्हिल क्लबमध्ये नव्या चार मैत्रिणींना सभसदत्व प्रदान करण्यात आले, तर तीन जुन्या सभासदांनी परत एकदा क्लबचे सभासदत्व स्विकारले. नवीन सभासदांना सभासदत्वाची शपथ पी.पी. स्वाती जोशी यांनी दिली. प्रमुख पाहुण्या अश्विनी गाडगीळ, यांची ओळख पी.पी. ॲड. सुजाता चव्हाण यांनी करून दिली. प्रमुख पाहुण्या अश्विनी गाडगीळ यांच्या हस्ते संपादिका वीणा मनोहर यांनी संपादित केलेल्या क्लबच्या संकल्पसिध्दी या बुलेटिनचे व सी. सी. सुलभा जोशी यांनी तयार केलेल्या क्लब रोस्टरचे प्रकाशन झाले. उपाध्यक्षा पुर्णिमा हळदीपूरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले व वैजयंतीबुवा, वंदना लघाटे व कानन मिरवणकर यांच्या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुप्रिया कुलकर्णी व विनया सहस्त्रबुध्दे यांनी केले.

## दहा दिवसांच्या बाळाला 'संजीवनी'

### ■ हृदयाच्या छिद्राची शस्त्रक्रिया यशस्वी

**पनवेल : वार्ताहर**

दहा दिवसाच्या अर्भकाच्या हृदयाच्या छिद्राची शस्त्रक्रिया खारघर येथील श्री सत्य साई संजीवनी हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या महेनतीमुळे व पनवेल महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती ॲड. नरेश ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे यशस्वी झाली आहे.




तटकरे दांपत्याला मुंबई येथील केईएम हॉस्पिटलमध्ये मुलगी झाली, मात्र त्या बाळाच्या हृदयाला छिद्र असल्याचे डॉक्टरांना १० दिवसानंतर निदर्शनास आले. त्यामुळे हृदयाची शस्त्रक्रिया करणे तातडीन गरजेची होती, मात्र त्या हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करणे अवघड होत होते. याचवेळी त्यांचे खारघर सेक्टर १० मोनार्क सोसायटी मध्ये राहणारे मित्र अमेय भांगळे यांच्या आईने नरेश ठाकूर यांना फोन करून या संदर्भातील माहिती दिली व त्यांना तातडीने मदत हवी आहे असे सांगितले व त्या बाळाला खारघर येथील श्री सत्य साई संजीवनी हॉस्पिटल येथे ॲडमिट करून तातडीने शस्त्रक्रिया केली तर तिचा प्राण वाचेल अशी माहिती दिली.

हे समजताच नरेश ठाकूर यांनी तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधला व याबाबतची सर्व माहिती देऊन तातडीने शस्त्रक्रिया करण्याची विनंती केली. त्यानुसार या बाळाला केईएम हॉस्पिटल येथून तातडीने श्री सत्य साई संजीवनी हॉस्पिटल खारघर येथे हलवण्यात आले व उपस्थित डॉक्टरांनी शर्तीचे प्रयत्न करून शस्त्रक्रिया यशस्वी केली.

ही शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली असून बाळाला २० दिवसानंतर हॉस्पिटल मधून डिस्चार्ज देण्यात आला. त्यामुळे या बाळाच्या आई-वडिलांनी आनंद व्यक्त केला असून, श्री सत्य साई संजीवनी हॉस्पिटलसह माजी स्थायी समिती सभापती ॲड. नरेश ठाकूर यांच्या आभार मानले.

## गव्हाण विद्यालयात गुरुजनांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक व सेवकांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सर्व गुरुजनांचा भेटवस्तू आणि गुलाब पुष्प देऊन सत्कार केला.



इयत्ता दहावी ब या गुरुकुल वर्गाच्या वतीने आयोजित केलेल्या समारंभात सर्व अध्यापकांचा सन्मान करताना विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. इयत्ता आठवी ब ची विद्यार्थीनी कु.दीक्षा वर्तक,इयत्ता पाचवी ब चे विद्यार्थी स्मित मोकल व स्मित म्हात्रे तसेच इयत्ता दहावी ब च्या विद्यार्थिनी भाविका कोळी आणि कु.हुस्नबानो शेख या विद्यार्थ्यांनी मराठी व हिंदी या भाषांमधून केलेल्या भाषणात गुरूंचा महिमा आणि गुरूपौर्णिमेचे महत्त्व विशद करून गुरुजनांप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या.

अध्यापकांच्या वतीने 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर व प्रमोद कोळी यांचीही समयोचित भाषणे झाली. इयत्ता दहावी ब या गुरुकुल वर्गाचे वर्गशिक्षक सागर रंधवे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले तर इयत्ता दहावी ब या वर्गातील विद्यार्थिनी किरण जयस्वार हिने इंग्रजी भाषेतून आभार मानले.

या कार्यक्रमास पर्यवेक्षक दीपक भर्णुके, 'रयत'च्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, जुनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, परीक्षा विभाग प्रमुख चित्रलेखा पाटील, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे, कार्यालयीन लेखनिक चंद्रकांत मढवी, सेवकांचे प्रतिनिधी डी. आर. ठाकूर तसेच सर्व शिक्षक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# संपादकीय

## स्वागतार्ह निर्णय

नव्याने सत्तेत आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारने पहिल्या पंधरा दिवसांतच पेट्रोलवरील ५ रूपये कर आणि डिझेलवरील ३ रूपये कर माफ करून टाकला आहे. महाराष्ट्रातील जनतेला मिळालेली ही एक मोठी भेटच म्हणावी लागेल. हाच निर्णय ठाकरे सरकारने घेतला असता, तर सामान्य जनतेला यापूर्वीच दिलासा मिळाला असता आणि सर्वांचेच जीवन थोडे सुसह्य झाले असते. परंतु खुर्ची बचाव कार्यक्रमात त्यांना सामान्य जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यात रसच उरला नव्हता.

**कोरोना काळात वाहून गेलेली दोन वर्षे आणि पाठोपाठ सुरू झालेले युक्रेन आणि रशियामधील युद्ध यामुळे जगातील अनेक देशांची आर्थिक गणिते पार बिघडून गेली. अर्थात आपला भारतदेखील त्यास अपवाद नव्हता. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने जागरुक राहून काही पावले उचलल्याने देशाची आर्थिक घडी तुलनेने वेगाने पुन्हा बसली. अर्थात, हे काम सोपे नव्हते. कोरोना काळ आणि युक्रेन-रशिया युद्धामुळे पेट्रोल-डिझेल आणि नैसर्गिक वायू आदि इंधनांचे दर कमालीचे भडकले. जैविक इंधने ही अशी गोष्ट आहे की ती कारखान्यात तयार होत नाही. आपल्या अधिपत्याखालील भूमीच्या गर्भात नैसर्गिक इंधनाचे साठे असावे लागतात. साऱ्याच देशांना असे साठे असण्याचे भाग्य लाभत नाही. भारतात देखील जैविक इंधनाचे साठे आहेत. परंतु १३० कोटी जनसंख्येच्या प्रगतशील देशाला ते तुटपुंजेच म्हणावे लागतील. स्वाभाविकपणे गेल्या दोन-अडीच वर्षांत इंधनाचे जागतिक दर वाढले, तेव्हा ओघाने भारतातील पेट्रोल-डिझेलचे भाव गगनाला भिडले. इंधन दरवाढ हे देखील आर्थिक संकटच असते. त्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढून अन्य मालाचे दर देखील वाढतात आणि त्याची परिणती महागाई भडकण्यात होते. तसे घडू नये म्हणून केंद्र सरकारने इंधनावरील कर कमी केला. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीवर केंद्र सरकार काही कर आकारणी करते, तर राज्य सरकार देखील आपल्या वाट्याचा कर त्यावर लादते. केंद्राने करकपात केल्यानंतर राज्य सरकारांनी देखील काही प्रमाणात कर घटवावेत आणि जनतेला दिलासा द्यावा अशी केंद्र सरकारची अपेक्षा होती. पंतप्रधान मोदी यांनी ती उघडपणे व्यक्तही केली होती. परंतु तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्याकडे सपशेल दुर्लक्ष केले. आता करकपातीनंतर शुक्रवारी मध्यरात्री बारा वाजल्यापासून मुंबईसह राज्यात पेट्रोलचे दर प्रति लीटर १०६ रुपये आणि डिझेलचे दर प्रति लीटर ९३ रूपये असे राहतील. इंधनाचे हे दर देखील सामान्यांच्या खिशाला जड आहेत हे मान्य करावे लागेल. परंतु या करकपातीमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर ६ हजार कोटी रूपयांचा ताण येणार आहे याचेही भान बाळगावेच लागेल. सामान्य माणूस असो वा सरकार, पैशाचे सोंग आणता येत नाही. भाजपशासित अन्य राज्यांप्रमाणे राज्य सरकारनेही इंधन दरात कपात करावी अशी मागणी गेल्या विधिमंडळ अधिवेशनात विरोधीपक्षांनी केली होती. परंतु ते परवडण्याजोगे नसल्याचे तेव्हाचे अर्थमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले होते. सरकारी तिजोरीमध्ये पडणारा खड्डा कसा बुजवायचा याचा वेगळा विचार नव्या सरकारला करावा लागेल. तसा तो होईलच. इंधन दर कपातीच्या या निर्णयाचे सर्व थरातून स्वागत होत आहे. यामुळे सामान्य माणसाचे जगणे सुसह्य होईल यात शंका नाही.**

# रायगड जिल्ह्यातील अग्निशमन यंत्रणा अद्ययावत करा



अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृहाला काही दिवसांपूर्वी भीषण आग लागली. अलिबाग नगर पालिकेसह, गेल, आरसीएफ आणि पेण येथील अग्नीशमन दलांनी या आगीवर नियंत्रण मिळविले. मात्र ही आग वेळेत विझविली न गेल्यामुळे नाट्यगृह पूर्णपणे भस्मसात झाले. सुदैवाने आग लागली तेव्हा नाट्यगृहात कोणताही कार्यक्रम सुरू नव्हता. त्यामुळे जिवितहानी टळली. दरम्यान, नाट्यगृहाला लागलेली आग हे एक उदाहरण आहे. जिल्ह्यात आज मोठमोठे औद्योगिक प्रकल्प आहेत. एखाद्या प्रकल्पात आग लागली तर ती विझविण्यासाठी रायगड जिल्ह्यात सक्षम अशी अग्निशमन यंत्रणाच नाही. याकडे आजपर्यंत दुर्लक्ष झाला आहे. रायगड जिल्ह्यातील वाढते औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाचा वेग लक्षात घेऊन जिल्ह्यातील अग्निशमन यंत्रणा अद्ययावत करण्याची गरज आहे.



यापूर्वी अलिबाग शहर व आसपासच्या परिसरात आग लागल्या आहेत. मात्र त्या किरकोळ होत्या. त्यामुळे त्या वेळीच नियंत्रणात आणल्या गेल्या. परंतु पीएनपी नाट्यगृहाला लागलेली आग मोठी होती. अलिबाग शहरालगतच्या परीसरात येवढ्या मोठ्या प्रमाणात आग लागण्याची ही पहिलीच वेळ होती. एवढी मोठी आग विझविण्यासाठी आलिबाग किंबहुना रायगड जिल्ह्यात यंत्रणाच नाही. जर अशी यंत्रणा असती तर पीएनपी नाट्यगृहाला लागलेली आग वेळेत नियंत्रणात आणता आली असती. या आगीमुळे अग्नीशमन दलाच्या मर्यादा या निमित्ताने प्रकर्षाने समोर आल्या.

अलिबाग लगतच्या परिसरात शहरीकरण मोठ्याप्रमाणात होऊ लागले आहे. वरसोली, चेंढरे, वेश्वी आणि कुरूळ परीसरात नागरीकरण वाढले आहे. सुधारीत नियमांनुसार आता अलिबाग परीसरात सात मजल्याच्या इमारतींना परवानगी मिळणार आहे. त्यामुळे आगामी काळात इमारतींची उंचीही वाढणार आहे. अलिबाग नगर पालिका सोडली तर चेंढरे, वरसोली आणि वेश्वी या ग्रामंपचायतींकडे स्वत:ची अग्निशमन यंत्रणा नाही. त्यामुळे सध्या त्यांना अलिबाग नगर पालिकेच्या अग्निशमन यंत्रणेवर या ग्रामपंचायती अवलंबून राहावे लागत आहे.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग शहरात जागेची कमतरता असल्याने शहरीकरणाचा विस्तार या तिन्ही ग्रामपंचायतींच्या दिशेने होत आहे. या परीसरात मोठ मोठे गृहनिर्माण प्रकल्प तयार होत आहे. मात्र ज्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. त्या प्रमाणात येथील अग्निशमन यंत्रणा सक्षम होताना दिसत नाही. नगरपालिकेकडे एक लहान आणि एक मोठा अग्निशमन बंब आहे. मात्र त्यावर काम करणारे कर्मचारी तेवढे प्रशिक्षित नाहीत. या परिसरातील नागरीकरणाचा वेग पाहता आणि भविष्याचा विचार करता अग्निशमन यंत्रणा अद्ययावत करणे आवश्यक आहे.

अलिबाग प्रमाणेच रायगड जिल्ह्यातील इतर तालुक्यातील परिस्थिती या पेक्षा फारशी वेगळी नाही. नगरपरिषदांकडे अग्निशमण यंत्रणा सक्षम नाही. मोठी आग लागल्यास तीचा फार उपयोग होत नाही. एखाद्या ठिकाणी कोठी आग लागल्यास खासगी कंपन्यांच्या अग्निशमन दलांची मदत घ्यावी लागते.

रायगड जिल्ह्यात तळोजा, पाताळगंगा, रसायनी, खालापूर, खोपोली, पेण, सुधागड, नागोठणे, माणगाव रोहा, महाड, अलिबाग, पेण या परिसरात फॅक्टरी ॲक्ट नुसार १५३१ उद्योग आहेत. ४५७ रासायनिक उद्योग आहेत तर अतिधोकादायक ७३ रासायनिक उद्योग जिल्ह्यात आहेत. जिल्ह्यात अनेक मोठ औद्योगिक प्रकल्प आहेत. तेथे देखील आग लागण्याच्या दुर्घटना घडल्या आहेत. काही वर्षापूर्वी अलिबाग तालुक्यात फटाक्याच्या कारखान्याला आग लागून त्यात १० कामगारांचा मृत्यू झाला होता. अशा आग लागण्याच्या छोट्या मोठ्या मोठ्या घटना घडत असतात. जिल्ह्यात औद्यागिक प्रकल्पांमध्ये मागील पाच वर्षात प्राणघातक, गंभीर, आग, स्फोट, वायुगळती होऊन ६४ कर्मचाऱ्यांना प्राण गमवावे लागले आहेत. या अपघातांमध्ये १९६ जण जखमी झाले आहेत. जखमीमध्ये काहीना अपंगत्वही आलेले आहे. २०१७मध्ये ३८ कारखान्यात ९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू तर २७ जण जखमी झाले आहेत. २०१८मध्ये ३८ कारखान्यात ८ मृत्यू तर ३४ जखमी झाले. २०१९मध्ये ४७ कारखान्यात १८ मृत्यू आणि ५१ जखमी झाले आहेत.

### अग्निशमन यंत्रणेत प्रशिक्षित कर्मचारीही नाहीत

**औद्योगिक प्रकल्पांमध्ये लागलेल्या आगींमध्ये जिवितहानी झाली आहे. या प्रकल्पांमध्ये स्वत:ची अग्निक्षमण यंत्रणा असतेच असे नाही. तसेच असली तरी ती पुरेसी नसते. जिल्ह्यातील वाढते औद्योगिकीकरण आणि शहरीकरण लक्षात घेऊन जिल्ह्यातील अग्निशमन यंत्रणा अद्ययावत करण्याची गरज निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील १५ तालुक्यापैकी १० तालुक्यात अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित आहे. पाच तालुक्यात अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नाही. ज्या ठिकाणी अग्निशमन यंत्रणा उपलब्ध आहे, तेथे प्रशिक्षित कर्मचारी नाहीत. ज्या नगरपरिषदांमध्ये अग्निक्षमन यंत्रणा आहे, तेथे प्रशिक्षित कर्मचारी नसल्यामुळे समस्या निर्माण होतात. या ठिकाणी शासनाने प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध करून द्यायला हवेत. रायगड जिल्ह्यात होणारे औद्यागिकरण व नागरिकरणाचा वेग पहाता या जिल्ह्यात अग्निशमन यंत्रणा अद्ययावत करणे ही काळची गरज आहे. त्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.**



## बदलते तंत्रज्ञान

### आपला पर्सनल डेटा लीक होण्यापासून असा वाचवा


तुमच्या डिव्हाइसवरील बहुतांश सेवा तुमचे नाव, तुम्ही भेट देत असलेल्या वेबसाइट, तुमचा नेटवर्क आयपी ॲड्रेस इत्यादींसह तुमचा वैयक्तिक डेटादेखील कॅप्चर करतात. आज आपण या समस्येपासून कशी सुटका मिळवायची हे जाणून घेऊया.

डेटा ही सध्याच्या युगातील सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. अशा परिस्थितीत लोक नेहमी तुमचा डेटा मिळविण्याचा प्रयत्न करत असतात. तुम्हाला काय खरेदी करायचे आहे हे अनेक जाहिरातदारांना जाणून घ्यायचे आहे. दुसरीकडे, काही हॅकर्सना तुमच्या खात्यात घुसून तुमचे महत्त्वाचे ऐवज चोरायचे आहेत. तुमच्या फोनमध्ये जीपीएस, कॅमेरा आणि इतर सेन्सर्स तसेच तुमचे संपर्क आणि आरोग्य माहिती यासारखा संवेदनशील डेटा आहे. अशा परिस्थितीत मोबाईल ॲप्सना परवानगी दिली तर ते ही माहिती सहज मिळवू शकतात. तुमचा वैयक्तिक डेटा चोरीला जाण्यापासून वाचवण्यासाठी, तुम्ही नियमितपणे वापरत नसलेली ॲप्स तुमच्या डिव्हाइसमधून हटवा. कारण असे अनेक ॲप्स आहेत जे तुमचा डेटा विकून पैसे कमवितात. वेलिझ म्हणतात की, जेव्हा तुम्ही तुमच्या फोनवरून एखादे ॲप डिलिट करता तेव्हा डेव्हलपर आणि त्याच्या भागीदारांद्वारे आधीच गोळा केलेली माहिती आपोआप गायब होणार नाही. तुम्हाला डेटा हटविण्याची विनंती करण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधावा लागेल. इम्पीरियल कॉलेज लंडनच्या संगणक विभागामध्ये डेटा-संरक्षण आणि गोपनीयता संशोधन करणारे हमीद हद्दादी म्हणतात, ॲप्स इन्स्टॉल करताना त्यांना प्रवेश प्रदान करण्याबद्दल नीट विचार करा. ॲपने परवानगी मागितल्यावर नंतर हा पर्याय निवडण्याचा प्रयत्न करा. एकदा ॲप्स इंस्टॉल झाल्यावर सेटिंग्जमध्ये त्यांचा डेटा, बॅटरी आणि स्टोरेज वापराचे पुनरावलोकन करा. परवानगी पुनरावलोकन आयफोन वापरकर्त्यांनी सेटिंग्ज वर जावे आणि इन्स्टॉल ॲप्सच्या सूचीवर खाली स्क्रोल करावे. आता कोणत्या ॲपला परवानगी दिली आहे ते तपासावे. त्यानंतर तुम्ही वापरत नसलेल्या ॲपची परवानगी रद्द करा. दुसरीकडे, अँड्रॉइड वापरकर्त्यांनी सेटिंग्ज उघडा आणि ॲप्स निवडा. आता परवानग्या पाहण्यासाठी प्रत्येक ॲपच्या नावावर टॅप करा. परवानगी निवडा आणि प्रवेश रद्द करण्यासाठी डोन्ट अलॉववर टॅप करा. तुम्ही वेगवेगळ्या साइट्सला भेट देता तेव्हा वेब जाहिरात ट्रॅकर तुमच्या ॲक्टिव्हिटीजचे अनुसरण करतात. यासाठी याकडे लक्ष द्या.



# मनस्वी लेखक माधव कोंडविलकर

## निमित्त



माधव कोंडविलकर हे एक मराठी कवी आणि लेखक होते. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात १५ जुलै १९४१मध्ये झाला. कोंडविलकरांनी ५०हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. राजापूरच्या सोगमवाडीत प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी मुंबईत माध्यमिक शिक्षण पूर्ण केले व कोकण विभागात प्राथमिक शिक्षक म्हणून ते रुजू झाले. ते एक मनस्वी लेखक होते.

माधव कोंडविलकरांना त्यावेळी प्रत्यक्ष जीवनात फार कटू अनुभव आले. हे अनुभव वर्तमानपत्रांतून, व अस्मितादर्श नियतकालिकामधून प्रसिद्ध होऊ लागले. मधु मंगेश कर्णिकांच्या प्रोत्साहनाने त्यांचे लेखन १९७७साली प्रथम 'तन्मय' दिवाळी अंकात प्रकाशित झाले. डायरीतल्या नोंदींसारखे हे लेखन दोन वर्षांनी 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या नावाने पुस्तकरूपात आले आणि एका दुर्लक्षित, उपेक्षित जीवनविश्वाचा परिचय मराठी वाचकांना झाला. पुढे हिंदी व फ्रेंच भाषेत अनुवाद झालेल्या या पुस्तकामुळे कोंडविलकर हे प्रथितयश मराठी लेखक म्हणून पुढे आले.

राजापुरी बोलीचा वापर करून लिहिलेल्या कोकणातील ग्रामीण जीवनाचा परिचय माधव कोडिलकरांच्या लेखनात दिसतो. त्यामुळेच बाबुराव बागुलांनी त्यांना कोकणातच अडकलेला भांबावलेला लेखक असे म्हटले असले तरी, मुंबईतील उपेक्षितांचे, गिरणी कामगारांचे जगणे टिपणारी 'देशोधडी' ही कादंबरी, शेतकरी आत्महत्येची वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेली बातमी वाचून लिहिलेली 'डाळं' किंवा 'एक होती कातळवाडी' आणि 'भूमिपुत्र' या जागतिकीकरणाचे परिणाम मांडणाऱ्या कादंबऱ्या वाचल्या की, कोंडविलकरांनी प्रादेशिकतेची तसेच दलित साहित्याची चौकटही ओलांडली होती असे समजून येते.

त्यांची प्रकाशित पुस्तके-अजून उजाडायचे आहे (आत्मकथनात्मक कादंबरी), अनाथ(आत्मकथनात्मक कादंबरी), आता उजाडेल(कादंबरी), एक होती कातळवाडी (कादंबरी), कळा त्या काळच्या (आत्मकथनात्मक कादंबरी), काहिली (कादंबरी), घालीन लोटांगण(धार्मिक), छेद (कादंबरी), झपाटलेला (कादंबरी), डाळं (कादंबरी), देवांचा प्रिय प्रियदर्शनी राजा सम्राट अशोक (ऐतिहासिक), देशोधडी निर्मळ (कादंबरी), भूमिपुत्र (कादंबरी), मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे (दलित साहित्य), स्वामी स्वरूपानंद (आध्यात्मिक), हाताची घडी तोंडावर बोट (कादंबरी), कोंडविलकर यांच्या साहित्यावरील पुस्तके-माधव कोंडविलकर साहित्य आणि समीक्षा (डॉ. शरद बिऱ्हाडे). दरम्यान कोंडविलकर यांचे निधन ११ सप्टेंबर २०२० रोजी झाले.



क्लिक...क्लिक...!

**जूनमध्ये पावसाने पाठ फिरविली होती. जुलैमध्ये मात्र पावसाने जोरदार बॅटींग करायला सुरुवात केली. बळीराजा सध्या शेतीकामात मग्न आहे. बरेच शेतकरी दिवसभर शेतात राबतात आणि सायंकाळीच घरी परततात. शेतात जेवण घेऊन जाताना या शेतकरीमहिला दिसत आहेत.** (छाया: सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर



### सकाळी पाणी पिणे लाभदायक!

बहुसंख्य जण आपल्या दिवसाची सुरुवात चहासारख्या गरम पेयाने करतात. तोंड धुतल्यानंतर आपण हा आनंद लुटतो. मात्र, आपण आपल्या दिवसाची सुरुवात दात घासण्याच्याही आधी रिकाम्या पोटी पाणी पिऊन करावी, असा सल्ला तज्ज्ञ देतात. यामुळे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. अलिकडे बरेच लोक स्वत:ला ही सवय लाऊन घेत आहेत.

रात्रभर झोपल्याने आपल्या तोंडामध्ये अनारोग्यकारक जिवाणू वाढतात. आपण सकाळी उठल्यावर पाणी प्यायल्यास हे जिवाणू गिळले जातात व पोटात नष्ट होतात. तोंड धुण्यापूर्वी थेट पाणी प्यायल्यास तोंडातील लाळही पोटात जाते. यामुळे शरीराला फायदा होतो. कारण लाळेतील काही घटक पोटातील अनेक समस्यांचा त्रास कमी करण्यास मदत करतात. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदतच होते. सकाळी रिकाम्या पोटी पाणी घेतल्याने पचनक्षमता वाढते. बद्धकोष्ठतेचा त्रास दूर होतो. त्यामुळे रक्तप्रवाह सुधारण्यास मदत होते. उच्च रक्तदाब सामान्य होण्यास मदत होते. सकाळीच प्यायलेल्या पाण्यामुळे मुखआरोग्य चांगले राहते. तोंडाची दुर्गंधी कमी होते. त्यामुळे तोंडात लाळेअभावी आलेला कोरडेपणा दूर होतो. या कोरडेपणामुळे विविध समस्या निर्माण होऊ शकतात. सकाळी पोट साफ होण्यास मदत होते. कफ, आम्लपित्त या समस्या आटोक्यात राहण्यास मदत होते, असे तज्ज्ञ सांगतात.

तज्ज्ञांच्या मते सकाळी दात घासण्याआधीच पाणी प्यायल्याने आपल्या शरीरातील विषद्रव्ये बाहेर टाकली जातात. दिवसभरही योग्य प्रमाणात पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या शरीराचे तापमान संतुलित राहते व नको असलेले घटक शरीराबाहेर टाकण्यास मदत होते. त्यामुळे पुरेशा प्रमाणात लाळनिर्मिती होते. लाळेने पचनक्रिया चांगली होण्यास मदत होऊन शरीरातील विविध अवयवांना आवश्यक पोषक घटक मिळतात. पोटावरील चरबी कमी होऊन वजन घटवण्यास मदत होते. दरम्यान, ही माहिती सामान्य माहितीच्या आधारावर दिली आहे. कधी आणि कोणत्या वेळी पाणी प्यावे आणि कुणाला ते किती उपयुक्त ठरले हे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार करावे.

# बहिरामकोटक गावाजवळील खारबंदिस्ती पाण्यात जाण्याची भीती

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील नारवेल-बेनवले या १६.४४ किलोमीटरच्या खारबंदिस्तचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरू असून, हे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे बोलले जात आहे. उन्हाळ्यापासूनच या खारबंदिस्तीला वारंवार खांडी जात होत्या. सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसात बंदिस्तीला पूर्ण भेगा पडल्या असून, बहिरामकोटक गाव जलमय होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पेण तालुक्यातील बहिरामकोटक गाव खाडीलगत आहे. येथील खारबंदिस्तीला आतापर्यंत तीन वेळा खांडी गेलेल्या आहेत. सध्या येथील खांडीवर तात्पुरता उपाय केला जात आहे. या खारबंदिस्तीसाठी दयानंद पाटील यांनी स्वतःच्या जमिनीतून जागा दिली आहे. मात्र या खारबंदिस्तीला एकाच जागेवर आतापर्यंत तीन वेळा खांडी गेल्या आहेत. चौथ्यावेळी या बंदिस्तीला पूर्ण भेगा पडल्या असून, बंदिस्ती खाडीच्या बाजूने सरकली आहे. पावसाळ्यात या ठिकाणी खांड गेली तर गावातील शेतकऱ्यांची शेती, शेततळे व घरे उद्ध्वस्त होऊन बहिरामकोटक गाव पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे.



बहिरामकोटक परिसरात मागील बुधवारपासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली आणि खारबंदिस्ती खाडीच्या बाजूने सरकत असल्याचे जाणवले. शुक्रवारी त्या खारबंदिस्तीला मोठमोठ्या भेगा पडल्याच्या दिसल्या शनिवारी या भेगा मोठ्या झाल्या व बांधाची पिचींग खाडीत सरकलेली दिसली. तेव्हापासून बहिरामकोटक ग्रामस्थांची झोप उडली आहे. खारबंदिस्ती फुटून घरात केव्हा पाणी शिरेल याचा काही भरोसा नाही. त्यामुळे घरात राहणेही धोकादायक वाटू लागले आहे, अशी प्रतिक्रिया गावातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**बहिरामकोटक येथील बांध खाडीच्या बाजूने सरकला आहे, हे सत्य आहे. युद्ध पातळीवर काम करून येथील खांड बांधण्यात येईल.**

**-दादासाहेब सोनटक्के, उपकार्यकारी अभियंता, खारभूमी विभाग, पेण**

## माथेरानमधील शिवसैनिक आमदार थोरवे यांच्या पाठीशी

**कर्जत : बातमीदार**

शिवसेनेच्या माथेरानमधील अनेक पदाधिकाऱ्यांनी एकनाथ शिंदे समर्थक आमदार महेंद्र थोरवे यांची साथ देण्याचा निर्णय घेतला असून त्यांनी थोरवे यांच्या समर्थनार्थ आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत.

माथेरानमधील शिवसेनेत गेल्या दीड वर्षापासून दोन गट निर्माण झाले होते. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ४० आमदारांनी वेगळा गट केल्यानंतर तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी शिंदे समर्थक आमदार महेंद्र थोरवे यांची साथ देण्यासाठी आपल्या पदाचे राजीनामे दिले. त्यानंतर माथेरानमधील शिवसेना पदाधिकारी आमदार थोरवे यांच्याकडे गेले आणि त्यांनी आपल्या पदाचे राजीनामे जिल्हा प्रमुखांच्याकडे पाठवून देण्याचा निर्णय घेतला. त्यात शिवसेनेचे माथेरान उपशहर प्रमुख प्रमोद नायक, महिला शहर संघटक संगीता जांभळे, युवासेनेचे गौरंग वाघेला, निखिल शिंदे, अनिकेत जाधव, चैतन्य शिंदे, निनाद तोरणे, खालिद शेख, युवती उपाधिकारी अंकिता तोरणे, निधी जाधव, संदिप शिंदे, ज्ञानेश्वर बागडे, अकबर मुजावर, अल्ताफ शेख, वसंत कदम, उमेश कदम, रवी बिरामणे, रामा आखाडे, लहू आखाडे, सचिन काळे, शलाका शेलार, अर्चना बिरामणे, सुहासिनी शिंदे यांचा समवेश आहे.

# कर्जत तालुक्यातील ४० एकर शेती पाण्यात

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील साळोख तर्फ नीड या गावातील राजनाला कालव्या लगतची पेरणी केलेली सुमारे ४० एकर शेती पाटबंधारे विभागाच्या हलगर्जीपणा व नियोजनशून्य कारभारामुळे वाहून गेली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, यंदा ही शेती ओसाड ठेवावी लागणार आहे.

**पाटबंधारे विभागाच्या हलगर्जीपणाचा साळोखमधील शेतकऱ्यांना फटका**

सुरुवातीला वरदान ठरणारा राजनाला कालवा गेल्या दोन-तीन वर्षांपासून कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी शाप ठरू लागला आहे. अशी संतप्त भावना या गावातील शेतकरी वर्ग व्यक्त करीत आहेत.

कर्जत तालुक्याच्या पूर्व भागात पाटबंधारे विभागाने सुमारे साठ वर्षांपूर्वी राजनाला कालवा तयार केला त्यामुळे त्या परिसरातील शेती दुबार पिकू लागली. पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सुटला. हा कालवा सुरुवातीला मातीने बांधण्यात आला होता. जागोजाग शिवारात नियंत्रित पाणी जावे यासाठी त्याला नियोजनबद्ध झडपा ठेवण्यात आल्या होत्या. या कालव्याला चाळीस-पंचेचाळीस वर्ष झाल्याने त्याच्या मजबुतीकरणासाठी या कालव्याचे काँक्रीटीकरण करण्याचे ठरले. आणि बऱ्याच अंशी या कालव्याचे नूतनीकरणही झाले. त्याकाळात दोन-तीन वर्षे या कालव्यातून पाणी सोडले जात नव्हते म्हणून दुबार पीक घेणे शक्य झाले नव्हते.

कालव्याचे काँक्रीटीकरण झाले परंतु नियोजनाचा अभाव असल्याने पूर्वीचा मातीचा कालवा होता तो बरा होता. असे म्हणण्याची वेळ अनेक शेतकऱ्यांवर आली. त्याचाच फटका साळोख गावातील शेतकऱ्यांना बसला. यंदा दुरुस्तीच्या नावाखाली पाच महिने पाणी दिले नाही. पिण्यासाठी पाणी सोडावे या लोकप्रतिनिधींच्या सुचनेमुळे घाईगर्दीने तात्पुरती दुरुस्ती करून फेब्रुवारी अखेरीस पाणी सोडले व मे अखेरीस बंद केले. पाणी बंद केल्यानंतर साळोख परिसरातील सायपानानजीक नाल्याचा बांध फोडला. १० जूनपर्यंत कुठेही मोऱ्या बसविल्या नाहीत आणि फोडलेला बांधही भरला नाही. त्यानंतर पाऊस सुरू झाला. शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. त्यानंतर पावसाने जोर धरला त्यामुळे राजनाला कालव्यातील सर्व पाणी वेगाने शेतात शिरले. त्यामुळे पेरण्या वाया गेल्या. गेल्या पाच-सहा दिवसांच्या संततधार पावसाने शेताचे बांधही राहिले नाहीत. विशेष म्हणजे सायपानाजवळ असलेला लोखंडी दरवाजा अद्याप लघु पाटबंधारे विभागाने उघडला नाही. तसेच डोंगरातील पाणी जाण्यासाठी राजनाल्याच्या खालून टाकलेल्या मोऱ्या कित्येक वर्षे दुरुस्त न केल्याने ते पाणीही राजनाल्यावरून आत येते.

चार-पाच दिवसांपूर्वी पाटबंधारे विभागाचे अधिकारी घटनास्थळी आले होते. त्यांनी पाहणी केली आणि आम्ही फोडलेला राजनाल्याचा बांध दुरुस्त करतो, असे सांगितले.

पाटबंधारे विभागाच्या हलगर्जीपणामुळे आमची शेती मात्र उद्ध्वस्त झाली. केवळ थातूर-मातूर कामे करतात. हा विभाग स्थानिक शेतकऱ्यांसाठी आहे की? मुंबईकर फार्महाऊसवाल्यांसाठी आहे हेच कळत नाही? आमचे झालेले नुकसान भरून द्यावे. अशी मागणी बाधीत शेतकरी करीत आहेत.

**पाटबंधारे विभागाच्या हलगर्जीपणामुळे व नियोजन शून्यतेमुळे आमची भातशेती उद्ध्वस्त झाली. एकतर उन्हाळी पीक नाही आणि आता पावसाळ्यातही पीक नाही. त्यामुळे कसे जगायचे हा प्रश्न निर्माण झाला आहे.**

**- बाळकृष्ण महादू मोरे, बाधित शेतकरी, साळोख तर्फ नीड, ता. कर्जत**

# पुरात अडकलेल्या सहा तरुणांना वाचवण्यात नागोठणे पोलिसांना यश



**नागोठणे : प्रतिनिधी**

अंबा नदीने बुधवारी सायंकाळी धोक्याची पातळी ओलांडल्यामुळे नागोठणे परिसरात जागोजागी पूर परिस्थिती निर्माण झाली होती. पळस येथे मासे पकडण्यासाठी गेलेले तरुण पुराच्या पाण्यात अडकून पडले होते, या तरुणांना वाचवण्यात नागोठणे पोलीस व रेस्क्यू टीमला यश आले आहे.

अंबा नदीने मंगळवारी सायंकाळी धोक्याची पातळी ओलांडली होती. पुराचे पाणी नागोठणे शहरातील काही भागात शिरले होते. बुधवारी संध्याकाळीही अंबा नदीला पूर आला होता. पळस गावाच्या हद्दीतील शिवराम शिंदे यांच्या विट्टभट्टीच्या मागच्या बाजूस मासे पकडण्यासाठी गेलेली सहा आदिवासी मुले पुराच्या पाण्यात अडकून पडली होती. त्याची माहिती पोलीस पाटील बबन शिंदे यांनी नागोठणे पोलिसांना दिली. पोलीस पथकाने महेश सानप यांच्या रेस्क्यु टीमला बोलावून त्या सहा मुलांना सुखरूप बाहेर काढले.

## गुरुपौर्णिमेनिमित्त उतेखोलवाडी शाळेतील वह्या वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील उतेखोलवाडी शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका विनया विवेक जाधव यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त बुधवारी (दि.१३) विद्यार्थ्यांना वह्या वाटप केल्या.

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून उतेखोलवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांना पुष्पगुच्छ व पेन देऊन सन्मानित केले. या वेळी विद्यार्थ्यांचे विविध खेळ घेण्यात आले.






## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **१) श्री. रविंद्र रघुनाथ नलावडे आणि २) सौ. रक्षा रविंद्र नलावडे, पत्ता १४, कृष्णा, अनुशक्ती नगर, मुंबई - ४०००९४** यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

पनवेल महानगरपालिका/सिडको यांचे हद्दीतील **फ्लॅट नं. ५०२, पाचवा मजला, बी टाईप, हावरे निर्मिती को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., बिल्डींग नं. ०५, प्लॉट नं. १५, सेक्टर २२, कामोठे, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड ज्याचे एकूण क्षेत्र. ३२७ चौ. फुट कारपेट एरिया + ३९ चौ. फुट टेरेस एरिया + ३१ चौ. फुट फ्लॉवर बेड एरिया** हि मिळकत. वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक/भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **सौ. सुनीला सुनील शेलार** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसापर्यंत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल,
दिनांक :- १५/०७/२०२२

**सही/-**
**ॲड. अतिश सुनील परदेशी**
**ॲड. हायकोर्ट**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स, श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबा. नं. ९७०२८९८९८९**



**उरण नगरपरिषद, उरण**
**ता. उरण, जिल्हा रायगड पिन कोड - ४००७०२**

जा.क्र.:उनप/सा.प्र.वि./टु-व्होटर ॲप/१४२०/२०२२-२०२३

## जाहीर सूचना

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०२२/संकीर्ण/का-१० दिनांक ०८ जुलै २०२२ अन्वये दिलेल्या निर्देशान्वये उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२२ बाबत सर्व नागरीक/संभाव्य उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते यांस कळविण्यात येते की, मा.राज्य निवडणूक आयोगाने True Voter मोबाईल ॲपच्या वापरा विषयाची दररोज दोन वेळेस म्हणजे दुपारी ४ ते ५ पर्यंत व संध्याकाळी ८ ते ९ पर्यंत प्रशिक्षण पुढील झुम लिंक वर http://ezee.live/True_Voter_Public_Training आयोजित केलेले आहे. सदर ॲप मध्ये येणाऱ्या निवडणूकांच्या अनुषंगाने True Voter ॲप मधील असंख्य विविध सुविधांचा उपयोग मतदारांनी, संभाव्य उमेदवारांनी त्यांचे कार्यकत्यांनी कशा प्रकारे करावा जेणकरुन अत्याधुनिक सुविधांचा आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील मतदारांना विशेष करुन संभाव्य उमेदवारांना अधिकाधिक लाभ घेता येईल. तसेच झूम वर ऑनलाईन ट्रेनिंग देण्यांची व्यवस्था निशुल्क करण्यात आलेली आहे. तरी या प्रशिक्षणाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे. झुम मिटींग फुल झाल्यास ऑनलाईन You Tube वेबीनारला जोडण्यासाठी पुढील लिंक चा वापर करावा. http://ezee.live/Candidates-Training-webinar तरि सदर नागरीकांनी त्याचा लाभ घ्यावा. तसेच निवडणूक प्रक्रियेतील बऱ्याच सुविधा True Voter ॲप मध्ये देण्यात आलेल्या असून त्या सुविधा पुढील प्रमाणे आहेत.

१) प्रारुप मतदार याद्या २) प्रारुप याद्यांवर विहीत मुदतीत आक्षेप घेण्यांची सुविधा ३) अंतिम प्रभाग/वॉर्ड निहाय, बूथनिहाय याद्या ४) उभे राहणाऱ्या उमेदवारांचे KYC बघण्यांची सुविधा ५) सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणूक निकाल बघण्याची सुविधा ६) सर्व उमेदवारांना निवडणूक खर्च ऑनलाईन सादर करण्यांची सुविधा ७) उमेदवारांना त्यांच्या प्रभागातील वोटर डिटेल्स गोळा करणे व एनालिसेस करण्यांची सुविधा ८) वोटर स्लिप whatsapp मेसेंज द्वारे पाठविण्यांची सुविधा.

उरण
दिनांक १४/०७/२०२२

**सही/-**
**(संतोष माळी)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**


# पळसदरी येथे गुरुपौर्णिमा हर्षोल्हासात

**कर्जत : प्रतिनिधी**



मागील दोन वर्षे कोरोना संकटात निर्बंध असल्याने गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यास बंधने होती. मात्र यंदा पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठात बुधवारी (दि. १३) गुरुपौर्णिमा हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. या वेळी मुसळधार पाऊस असूनही मोठ्या प्रमाणात स्वामी भक्तांनी दर्शनाचा तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला.

बुधवारी सकाळी अभिषेक, दत्तयाग, तसेच दुपारी आरती, महाप्रसाद व मठाधिपती स्व. दादा दरेकर यांचे ज्येष्ठ पुत्र विक्रांत दरेकर नित्यनेमाने सेवा करणाऱ्या वत्सला वांजळे, विजु दरेकर, नितीन चिंदरकर, निलेश सुर्वे, महेश कानिटकर आदीं सेवेकऱ्यांचा तसेच खजिनदार भानू काका शिंदे, महाप्रसाद बनविणारे आचारी शंकर पवार, सखाराम पवार, कर्मचारी दिलीप पांडे, दादू दरेकर, सदानंद लोखंडे, देवेंद्र तांबे आदींचा गुरुपौर्णिमा अन्नदान मित्र परिवाराच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कर्जतच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, माजी नगरसेविका अरुणा वायकर यांना शाल श्रीफळ देण्यात आले.

ॲड. राजेंद्र निगुडकर, राजू पोतदार, अशोक शितोळे, दीपक कुलकर्णी, सचिन दरेकर, प्रमोद दानवे, मंगेश शिंदे, सुभाष पाटील यांच्यासह स्वामी भक्त या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील निर्माण होणाऱ्या ई-वेस्टची घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २०१६ नूसार बाह्य यंत्रणेद्वारे कचरा उचलून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणेकामी तातडीने इच्छुक स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागवित आहोत. इच्छुक स्वारस्य अभिव्यक्तींनी त्यांच्या संस्थेचे नाव महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात दिनांक -२८/०७/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत सादर करावीत. सदर तारखे नंतर आलेली स्वारस्य अभिव्यक्ती विचारात घेतली जाणार नाहीत. सदरबाबत अधिक माहिती panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**सही/-**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा./घकवि/२५२२/प्र.क्र.-११९/४६८/२०२२,
दि. १४/०७/२०२२


# पालीतील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचा वर्धापन दिन उत्साहात

**पाली : प्रतिनिधी**



सुधागड तालुक्यातील पाली येथील श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास केंद्राचा दहावा वर्धापन दिन नुकताच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

पालीतील श्री स्वामी समर्थ नगर येथे दहा वर्षांपूर्वी श्री स्वामी समर्थांची प्रतिष्ठापना व श्री स्वामी समर्थ केंद्राची स्थापना करण्यात आली होती. या केंद्रात दिंडोरी प्रणित मार्गातून विविध आध्यात्मिक सेवा घेण्यात येतात. ज्ञान भंडारच्या माध्यमातून आयुर्वेदिक औषधे, आध्यात्मिक, सणवार तसेच कृषी विषयक माहिती देणारे मासिक अंक उपलब्ध केले जातात.

परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने केंद्राचा दहावा वर्धापनदिन साजरा झाला. या वेळी सत्यनारायणाची महापूजा तेच श्री स्वामी समर्थ चरित्राचे सामुदायिक पारायण झाले. आरतीनंतर सेवेकऱ्यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. वर्धापन दिन साजरा करण्यासाठी विश्वस्त मंडळ आणि पालीतील सर्व सेवेकरी व श्री स्वामी समर्थ नगरातील सर्व रहिवासींनी सक्रिय सहभाग घेतला होता.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशील कल्पना जनार्दन शेळके रा. आदई, ता. पनवेल यांनी तिरुपती बाळाजी बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे संचालक १) श्री. महेन्द्र पवन सिंग २) सौ. रिंकू महेन्द्र सिंग ३) श्री. रमेश गुलाब चौधरी ४) श्री. संदीप काळूराम पाटील यांची खालील वर्णनाची सदनिका खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**सदनिकेचे वर्णन**
**प्लॉट नं. १०, सेक्टर नं. १२,**
**मौजे नवीन पनवेल, ता. पनवेल**

| मौजे | इमारतीचे नाव | रुम नं. | मजला | क्षेत्र (चौ.फुट) (बिल्टअप) |
|---|---|---|---|---|
| नवीन पनवेल | साईसागर | F-२ | तळमजला | ५२०चा.फुट |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, साठेकरार, कुळ, वहिवाट, लिज, इजमेंट, हुकूमनामा, दरखास्त, दावा, अपील, दरखास्त, हुकूमनामा, ग्राहक कोर्टाचा निकाल, अदलाबदल, वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ता. १३/०७/२०२२
पनवेल

**सही/-**
**ॲड. वाय. एस. भोपी**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबाईल : ९८२०२७३६९१**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, १) श्री. काळूराम विठ्ठल घरत, २) श्री. आंबू विठ्ठल घरत, ३) श्री. गजानन वामन गायकवाड, ४) श्री. हरीश्चंद्र वामन गायकवाड, ५) श्रीमती. पदूबाई बाबू पाटील, ६) श्रीमती. हासुबाई उर्फ गिताबाई माया म्हात्रे, ७) श्रीमती. बायोबाई उर्फ बयवबई केशव घरत, ८) श्री. प्रल्हाद केशव घरत, ९) श्री. लालचंद केशव घरत, १०) श्री. अनिल केशव घरत, ११) श्री. अरूण केशव घरत, १२) सौ. शानुबाई ज्ञानेश्वर पाटील, १३) सौ. कमल करबा भोईर उर्फ श्रीमती. कमल करण भोईर, १४) सौ. सुजाता सुजीत मढवी, १५) श्री. बबन गणपत घरत, १६) श्रीमती. हौसाबाई रामजी घरत, १७) श्री. कृष्णा रामजी घरत, १८) श्री. जयदास रामजी घरत, १९) श्रीमती. कल्पना रोहीदास घरत, २०) श्री. बारीश रोहीदास घरत, २१) श्रीमती. धनश्री रोहीदास घरत उर्फ सौ. अस्मिता प्रवीण भगत, २२) श्रीमती. सिताबाई परशुराम घरत, २३) श्री. राजेंद्र परशुराम घरत, २४) श्री. अजय उर्फ अजित परशुराम घरत, २५) सौ. विद्या हरिचंद्र पाटील, २६) श्रीमती. राधाबाई उर्फ लक्ष्मी मारूती नाईक, २७) श्री. बाळाराम विठ्ठल घरत, २८) श्रीमती. मुक्ताबाई उर्फ मुक्ता गणपत पाटील, २९) श्रीमती. अनुबाई उर्फ आनंदी हिरा म्हात्रे, ३०) श्रीमती. शकुंतला हौसाराम म्हात्रे उर्फ श्रीमती. सिताबाई हसुराम म्हात्रे ३१) श्रीमती. बारकुबाई गणा भोईर, ३२) श्रीमती. सुशीलाबाई काना घरत यांस शासनाचे २२.५ टक्के योजने अंतर्गत सिडकोतर्फे फाईल/युनीट केस क्र. ओवळे २२७ अन्वये पुष्पकनगर नोड-दापोली, ता. पनवेल, जि. रायगड येथे भूखंड क. १४१, सेक्टर नं. ३, क्षेत्र १८०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड दिनांक १५/०९/२०२१ रोजीच्या भाडेपट्टा कराराने वाटप करण्यात आलेला आहे. सदरचा भाडेपट्टा करार दुय्यम निबंधक कार्यालय पनवेल येथे नोंदणी क्र. १०२६८/२०२१ दिनांक २४/०९/२०२१ रोजी नोंद करण्यात आला आहे. सदरचा भूखंड श्री. काळूराम विठ्ठल घरत वगैरे यांनी सिडको परवानगीने आमचे अशिल १) मे. ॲडमायर इंन्फ्रा भागीदारी संस्था तर्फे भागीदार अ) श्री. जेठा करमशी बेरा व ब) श्री. हरेश मेघजी रावारीया आणि २) मे. अस्टेल रिअल्टी भागीदारी संस्था तर्फे भागीदार अ) श्री. अशोकभाई पानाचंदभाई दोशी, ब) श्रीमती. सल्पा रमेश बंगेरा व क) श्रीमती. मिना महेंद्र राठोड यांच्या लाभात नोंदणीकृत त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करण्याचे ठरविलेले आहे.

तरी सदरहू भाडेपट्टाधारक यांचे व्यतिरिक्त सदरहू मिळकतींसंदर्भात कोणाचाही दान, गहाण, बक्षीस फरोक्त साठेकरार, लिन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र निवारा कुळवहिवाट, ताबा कबजा, वचन चिठ्ठी, दावा, दरखास्त जप्ती, संपादन रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा कसलाही व कोणताही हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत खालील सह्या करणार वकील यांजकडे लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास व मागाहून येणाऱ्या हरकती ह्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन, सदरच्या मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरुन तशा निर्वेधतेचा दाखला खाली सह्या करणार वकील देतील व आमचे अशिल सदरहू मिळकतींचा ठरलेला व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कामोठे, नवी मुंबई
दि. १२/०७/२०२२

**सही/-**
**ॲड. नवीन वी. धोंगडी**
**पत्र व्यवहाराचा पत्ता : फ्लॅट नंबर डी-४०१, ग्रिनस्केप रॉयल को.ऑप.हौ.सो. ली., प्लॉट नं. २५, सेक्टर ७, कामोठे पोलीस स्टेशनजवळ, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९. मो.क्र. ९००४०८७८७३**

## निवडक



### पनवेल ते लोणावळा मोटरसायकल रॅली

**पनवेल :** देशाच्या आजादी महोत्सवानिमित्त पनवेल रेल्वे स्टेशन ते लोणावळा मोटरसायकल रॅली आरपीएफ जवानांनी काढली होती. या रॅलीला डीएससी-०१ कल्याणचे नवीन कुमार, स्टेशन मास्टर जगदीश प्रसाद मीणा, पोलीस अधिकारी जसबीर राणा यांच्यासह टीसीचे पथक उपस्थित होते. त्यांनी झेंडा उंचावून या रॅलीला शुभेच्या दिल्या.

### पनवेलमधून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** कोणास काही न सांगता एक तरुणी घरातून कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रविना शनिवार पारधी (रा. गराडा) असे तिचे नाव असून रंग सावळा, उंची पाच फूट, चेहरा गोल, डोळे काळे असून अंगात पिवळा टॉप व सफेद लेगीज व पायात स्लीपर घातलेली आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस नाईक बी. ए. शिरसाट यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### पनवेलमध्ये कन्यादान सोहळा

**पनवेल :** येथील श्री साई नारायण बाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थान यांच्या वतीने ८३वा शास्त्रयुक्त कन्यादान सोहळा साई भक्तांच्या उपस्थितीत झाला. सद्गुरू श्री साई नारायण बाबा यांच्या आशीर्वादाने ८३वा शास्त्रयुक्त कन्यादान सोहळा श्री साई बाबा मंदिर स्टेशन रोड पनवेल येथे आयोजित करण्यात आला होता. अंत्यत शास्त्रयुक्त पद्धतीने हा सोहळा झाला असून या ठिकाणी या कन्यादान सोहळ्यानिमित्त झालेला सर्व खर्च श्री साई नारायण बाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थान यांच्या वतीने करण्यात आला. या वेळी वधू-वरांना आवश्यक असणाऱ्या संसारोपयोगी वस्तू व इतर साहित्य या वेळी संस्थेच्या वतीने देण्यात आले.



### उरण महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राज्य परिवहन महामंडळ, उरण आगार परिसरात हे वृक्षारोपण करण्यात आले. प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड, रा.प.म.उरण आगार व्यवस्थापक सतिश तुळशीराम मालचे, कार्यालयीन अधिक्षक तानाजी घ्यार, आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण, प्रा. ए. के. गायकवाड, प्रा. डॉ. एम. जी. लोणे, प्रा. आर. टी. ठवरे, आगारातील इतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळ एकूण १२५ वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणाच्या यशस्वीतेसाठी अकाउन्टसी विभागाचे प्रमुख के. ए. शामा, एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. हिंगमिरे, सहकार्यक्रमाधिकारी मेघा रेड्डी आदींनी मेहनत घेतली.

### आषाढी एकादशीनिमित्त दिंडी

**उरण :** द्रोणागिरी हायस्कूलमध्ये (मराठी व सेमी इंग्रजी माध्यम) आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.



पालखीतील विठ्ठल रखुमाईच्या प्रतिमेचे पूजन करून दिंडी नवापाडा व करंजा पाड्यात फिरवून परत हायस्कूलमध्ये आली. नवापाड्यात दिंडीतील सर्वांनी मंदिरात गणपती, हनुमंत व विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले. हायस्कूलचे चेअरमन सिताराम नाखवा, व्हाईस चेअरमन के. एल. कोळी, सदस्य देविदास थळी, शरद पाटील, मुख्याध्यापक एम. जी. म्हात्रे शिक्षक वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.



**पनवेल : खांदा कॉलनी येथे गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुपादुकांचे पूजन करण्यात आले.**

# नवी मुंबईत होणार फ्लेमिंगो बर्ड वॉच टॉवर

## भाजप माजी नगरसेवकाच्या पाठपुराव्याला यश

**नवी मुंबई : बातमीदार**

फ्लेमिंगो व पक्षी प्रेमी व पक्षी अभ्यासकांसाठी नवी मुंबई पालिकेने एक पाऊल पुढे टाकले आहे. पक्षी प्रेमी व निरोक्षकांना सहज आपल्या आवडत्या फ्लेमिंगो पक्ष्याचे निरीक्षण करता यावे, न्याहाळता यावे यासाठी फ्लेमिंगो बर्ड वॉच टॉवर उभारण्यात येणार आहे. यासाठी भाजपचे माजी नगरसेवक विनोद म्हात्रे यांनी पाठपुरावा केला होता. फ्लेमिंगो बर्ड वॉच टॉवरसाठी पालिकेने निविदा मागवल्या आहेत, मात्र पालिकेला वन विभाग व एमसीझेडएमएची परवानगीदेखील आवश्यक असणार आहे.

नवी मुंबई शहराला समृद्ध खाडी किनारा लाभला आहे. खाडी किनाऱ्याजवळ रहिवाशी भाग क्वचित असल्याने कांदळवनांनी वेढलेले आहे. या कांदळवनांमुळे नवी मुंबई खाडीत जैवविविधता टिकून आहे. त्याचा परिणाम म्हणजे जगात आपल्या रंगामुळे दौलदार रचनेमुळे सर्वत्र प्रसिद्ध व आकर्षणाचे केंद्र बिंदू ठरलेले फ्लेमिंगो पक्षी नवी मुंबईच्या खाडी किनाऱ्यावर येणे पसंत करत आहेत. आजतागायत या जागतिक दर्जाच्या पक्ष्यांकडे नवी मुंबई पालिकेने दुर्लक्षच केले होते. हा समृद्ध वारसा टिकावा व टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत यासाठी मविआ सरकार उदासीनता दिसून आली होती.

नवी मुंबई शहराने विकासाची झेप घेतल्यावर मात्र इथे राहण्यास आलेल्या नागरिकांकडून व काही पर्यावरणवादी संस्थांकडून मात्र फ्लेमिंगो संवर्धनासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून आले. त्यास भूमिपुत्रांची साथ मिळाली, मात्र पालिका स्तरावर हे काम होणे गरजेचे होते. १९९२ साली पालिकेची स्थापना झाल्यावर तब्बल ३० वर्षांनी फ्लेमिंगोंचे महत्व पालिकेला पाटल्याचे दिसून येत आहे. पर्यावरण प्रेमी असलेले आयुक्ता अभिजित बांगर यांनी स्वच्छ सर्वेक्षणाचा आधार घेत संपूर्ण शहरातच फ्लेमिंगो सिटीची कल्पना राबवली. त्यातून शहरात सर्वत्र फ्लेमिंगोबाबत जनजागृती आहे. एकाएकी नवी मुंबई शहर हे फ्लेमिंगो सिटी म्हणून ओळखले जाऊ लागले. एकीकडे वन विभागाकडून ऐरोली ठाणे खाडीत फ्लेमिंगो सफारी सुरू करण्यात आली आहे तर दुसरीकडे त्याच नवी मुंबईचा भाग असलेल्या नेरुळ टी एस चाणक्य व एनआरआय गृह संकुला शेजारी असलेल्या पाणथळ जागेबाबत मात्र कोणतेही पाऊल उचलण्यात आले नव्हते. याची खंत पर्यावरणवादी संस्था करत आल्या आहेत. एकीकडे नवी मुंबईत पालिका एकही पर्यटन स्थळ निर्माण करू शकलेली नाही. त्यात फ्लेमिंगो संवर्धनाबाबतचे वास्तववादी चित्र व झालेले दुर्लक्ष लक्षात घेत आयुक्त बांगर यांनी फ्लेमिंगोसारख्या दुर्लक्षित राहिलेल्या विषयाला महत्त्व प्राप्त करून दिले आहे.

> **करावे गावालगत टी. एस. चाणक्य ते एन. आर. आय कॉम्पलेक्स सर्व्हीस रस्ता तयार करणे, टी. एस. चाणक्यच्या संरक्षक भिंती मागील रस्ता टी. एस. चाणक्य जेटी पर्यंत तयार करणे, टी. एस. चाणक्य ते एन. आर. आय कॉम्पलेक्समधील मिठागराच्या पाणथळ जागेत येणारे फ्लेमिंगो पक्षी व इतर विविध पक्षी निरिक्षण व पाहण्यासाठी टेहळणी टॉवर उभारणे. दशक्रिया विधीसाठी अजतागयत् अधिकृत शेड उभारण्यात आली नव्हती टी तयार करण्यात येणार आहे. अशा विविध मागण्या केल्या होत्या त्यास यश आले आहे.**
> **-विनोद म्हात्रे, माजी नगरसेवक, भाजप**

मात्र यापुढच्या काळात नवी मुंबई पालिकेला ही ओळख जपावी लागणार आहे. पर्यावरण वादी संस्था म्हणून आम्ही देखील पालिकेला साथ देण्यास तयार रुग्णालय पर्यावरण संस्था नातकनेक्त फाउंडेशनचे अध्यक्ष बी. एन. कुमार यांनी सांगितले. त्यामुळे बर्ड वॉच टॉवर उभारण्याचे उचललेले पुढे हे फ्लेमिंगो संवर्धनासाठी स्वागतार्ह मानले जात असून; पाणथळ जागा नष्ट करणाऱ्यांवरदेखील लक्ष ठेवणे सोपे जाणार आहे. माजी नगरसेवक विनोद म्हात्रे यांनी टी. एस. चाणक्य येथे फ्लेमिंगो वॉच टॉवर उभारावा, अशी मागणी आयुक्तांकडे केली होती. त्यानुसार टी. एस. चाणक्य येथे वॉच टॉवर उभारण्यास आयुक्तांनी सहमती दर्शवली आहे. त्याबाबत पालिकेने निविदादेखील मागवली आहे. पक्षी प्रेमींसाठी ही आनंदाची बाब असणार आहे. त्यांना जवळून पक्षी न्याहाळता येणार आहेत. त्यामुळे पक्ष्यांच्या जवळ जाऊन त्यांना त्रासदायक ठरणाऱ्या मानवी कृत्यातून पक्ष्यांची सुटका होणार आहे. म्हात्रे यांच्या मागणीनुसार टी. एस. चाणक्य ते एनआरआय असा अंतर्गत जोडणारा मार्ग व टि. एस. चाणक्य जेटीपर्यंत देखील रस्ता तयार करण्यात येणार आहे.



## मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून नवी मुंबईच्या विकासासाठी १७ कोटींचा निधी उपलब्ध

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ सभापती विजय नाहटा व माजी विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आपल्या शेकडो कार्यकर्ते आणि माजी नगरसेवकांच्या समवेत आनंदवन येथे भेट घेतली होती. त्या भेटीदरम्यान विजय नाहटा व विजय चौगुले यांनी माजी नगरसेवकांच्या प्रभागांत विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री शिंदे शिंदे यांनी तत्काळ १७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

निधी उपलब्ध झाल्याने माजी नगरसेवकांच्या प्रभागतील कामे लवकरात लवकर पूर्ण करता येणार आहे. या निधीतून नवी मुंबईतील प्रभागात नागरी विकासाची कामे केली जावीत म्हणून हा तात्काळ निधी देण्यात आला आहे. तसेच प्रभागाचा विकास व्हावा नागरिकांना योग्य सुविधा मिळाव्यात म्हणून आणखी निधी लागला तर तोही तात्काळ देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी कळवले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमच्या मागणीची तत्काळ दाखल घेऊन नवी मुंबईसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ सभापती विजय नाहटा व माजी विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत.

(छाया : जीवन केणी)



**उरण : तालुक्याला जोरदार पावसाने झोडपले आहे. त्यामुळे शेवा बंदर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी क्षिरसागर, हवालदार सचिन गोडे, नाईक संजय कूथे व इतर पथकांनी ओसांडून वाहत असलेल्या रानसई धरणाची पाहणी केली.**

## उरणमध्ये गुरुपौर्णिमा सर्वत्र साजरी

**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ आध्यत्मिक व बाल विकास समाज मंदिर (दिंडोरी प्रणित) उरण येथे गुरुपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यात सकाळी भूपाळी, श्री स्वामी समर्थ अभिषेक श्री स्वामी सारामृत वाचन हवन नैवेद्य आरती, औदुंबर प्रदक्षिणा सायंकाळी नैवेद्य आरती आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उरण परिसरातील मोरा कोळीवाडा, बोरी, केगाव, अंबिका वाडी, श्री स्वामी समर्थ मठ विनायक, तेलीपाडा, मुलेखंड आदी ठिकाणी साई बाबा मंदिरात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. उरण केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक कोळी वाडा येथील एक मुखी दत्त मंदिरात भजन महाआरती, पालखी उत्सव, महाप्रसाद आदींचे आयोजनक करण्यात आले होते. हजारो भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला, असे मंदिराचे मालक जगदीश कोळी यांनी सांगितले.

श्री स्वामी समर्थ मठ विनायक येथेही भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.

## पनवेलच्या श्री स्वामी समर्थ मठात गुरुपौर्णिमा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यासह सर्वदूर ख्याती असलेल्या शहरातील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठात गुरुपौर्णिमेचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गेली दोन वर्षे कोरोनाच्या संकटामुळे शासनाच्या निर्देशानुसार मोजक्या सेवेकऱ्यांच्या उपस्थितीत गुरुपौर्णिमा उत्सव अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात येत होता, मात्र यंदा कोरोनाचे सावट टळल्याने असंख्य भाविकांच्या उपस्थितीत गुरुपौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली.



गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर श्री स्वामी समर्थांच्या मठात आकर्षक फुलांची सजावट आणि रोषणाई करण्यात आली होती. दरवर्षी मठात गुरुपौर्णिमेनिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. परमपूज्य नाना महाराज यांच्या आशीर्वादाने मठाधिपती स्वामीभक्त सुधाकर भाऊ घरत यांचे सेवा कार्य अविरतपणे सुरू आहे. गेली ३५ ते ४० वर्षे दत्तजयंती, स्वामी समर्थ प्रकटदिन, गुरुपौर्णिमा, गोपाळकृष्ण जयंती, गणेशजयंती, हरिपाठ, स्तोत्रपाठ, नित्य कीर्तने, प्रवचने, महाप्रसाद यासह विविध धार्मिक सोहळ्याचे याठिकाणी आयोजन करण्यात येते.

## गुरुपौर्णिमेनिमित्त विद्याभवन संकुलात विविध उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात गुरुपौर्णिमेनिमित्त एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

मुख्याध्यापक राजेंद्र ढेरगे आणि सुवर्णा मिसाळ यांच्या हस्ते व्यासगुरुंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. माध्यमिक तसेच प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त आपले विचार व्यक्त केले. शिक्षक अविनाश कुलकर्णी यांनी गुरुपौर्णिमा साजरी करण्यामागील उद्देश व्यक्त केला. मुख्याध्यापक राजेंद्र ढेरगे यांनी ज्ञानाशी एकरूप राहण्याचा सल्ला दिला. श्रुती कुलकर्णी आणि अनघा घनवट या विद्यार्थिनींनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या विषयास अनुसरून स्मरणशक्ती स्पर्धा, भेटकार्ड बनवणे स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, छत्री रंगवणे स्पर्धा असे उपक्रम घेण्यात आले. काही विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे औक्षण केले. शालिनी औचर यांनी शिक्षकांसाठी आरोग्यविषयक उपकरणे देणगीरूपात दिली.



## लिमये महाविद्यालय गुरुपौर्णिमा


**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथील शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी समर्थ, सुसंस्कृत भारत बनवण्यासाठी आदर्श गुरूंची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन उत्तर रायगड एन. एस. एस. जिल्हा समन्वयक प्रोफेसर जाधव बी. बी. यांनी केले. त्यांनी महर्षी व्यासांचे कार्य व गुरुपौर्णिमेचे महत्त्व विषद केले.



डॉ. प्रिती महाजन यांनी विद्यार्थ्यांनी गुरुंकडून कसे ज्ञान आत्मसात करावे हे सांगितले. अध्यक्षीय मनोगत प्रभारी प्राचार्य डॉ. मनिषा बनसोडे यांनी केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांबाबत आदर व्यक्त केला. स्वंयसेवकांनी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांना पेनवाटप केले. तसेच प्लास्टिक निर्मूलन व पर्यावरण संवर्धन करण्याच्या उद्देशाने व टाकाऊपासून टिकाऊ उपक्रमांतर्गत वर्तमानपत्रे व इतर रद्दी पेपर यांपासून कागदी पिशव्या विज्ञान शाखेच्या एनएसएस स्वयंसेवकांनी बनवलेल्या होत्या, त्यांचे वाटप करण्यात आले.

सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेमधील स्वयंसेविका मंजुश्री सुळे हिने केले. तसेच प्रास्ताविक करून आभार डॉ. भारती आरोटे यांनी मानले. प्राध्यापक, प्राध्यापिकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी एनएसएस विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी मंजुश्री, निखिल, जय, अरबाझ, राज, शारदा, पिंजारी व इतरांनी विशेष परिश्रम घेतले.

# पेण तालुक्याला पावसाचा तडाखा

- शहापाडा धरण ओव्हरफ्लो
- अनेक घरांची पडझड

(छाया : अनिस मनियार)









**पेण : प्रतिनिधी**

मुसळधार पावसाचा पेण तालुक्याला जोरदार तडाखा बसला असून अनेक ठिकाणी पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. या पावसामुळे तालुक्यासह शहरातील अनेक भागात पाणी साचून राहिले. नदी, नाले तसेच शहापाडा धरण ओसांडून वाहू लागले आहे. त्यामुळे नदीकिनारी असणाऱ्या गावांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जुलै महिन्याच्या सुरूवातीपासून पेण तालुक्यात पावसाने चांगली सुरुवात केल्यामुळे शेतकरी सुखावले होते. मात्र गेल्या दोन तीन दिवसापासून मुसळधार पावसाने हजेरी लावल्यामुळे पेण शहरातील एसटी स्थानक, कोळीवाडा, चिंचपाडा, विठ्ठलआळी, कारमेल स्कुल, महाडीकवाडी, पामबीच रोडसह तालुक्यातील अंतोरे, खरोशी, तांबडशेत आदी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी भरल्याने तालुक्यात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

पेण तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला असून, त्यात अनेक घरांचे नुकसान झाले आहे. पेण शहरातील पिरडोंगरी येथे एका घराची भिंत कोसळली. महलमिऱ्या डोंगर चाफेगणी येथील मध्या बाळ्या जाधव आणि लक्ष्मण हिऱ्या शिद यांच्या घरांचे नुकसान झाले आहे. तर वाशिवली करंबेली येथे सुनील पवार यांचा गुरांचा गोठा कोसळला आहे. करोटी येथील बारक्या पवार यांच्या घराची भिंती कोसळली आहे. आष्टे येथे संदीप मधुकर मोगल यांच्या कुडामेडीचे घर पूर्ण पडून नुकसान झाले आहे. या कुटुंबामधील चार सदस्यांना त्यांच्या आईच्या घरामध्ये स्थलांतरित केले आहे. बेलवडे बुद्रुक येथील मधुकर कृष्णा पाटील यांच्या घराचे आणि गोठ्याचे नुकसान झाले आहे. पीरडोंगरी येथील तीन कुटुंबातील १५ लोकांना बौद्धनगर येथील पेण नगरपालिका शाळेत स्थलांतरित करण्यात आले आहे. ठाकूरपाडा गावातील समशानभूमीच्या शेडचे पत्रे उडून नुकसान झाले आहे.

पावसाचा जोर पुढील दोन दिवस कायम राहणार असल्याने खाडी किनारी असणाऱ्या ग्रामस्थांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाडमध्ये पावसाचा जोर ओसरला

## चांढवे खुर्द गावात कोसळली दरड



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

पावसाचा जोर गुरुवारी (दि. १४) कमी झाला असला तरीही दोन वेळा पुराने हुलकावणी दिल्याने महाडमध्ये अजूनही चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान बुधवारी झालेल्या पावसामुळे तालुक्यामध्ये दोन घरांचे नुकसान झाले तर एका गावामध्ये दरड कोसळली. काही ठिकाणी रस्त्यांवर झाडे कोसळल्याने वाहतूक व्यवस्था कोलमडली होती. प्रशासनाच्या तत्परतेमुळे जनजीवन सुरळीत सुरू आहे.

महाडमध्ये सावित्री व गांधारी नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्यामुळे बुधवारी शहरातील सखल भागात पुराचे पाणी साचले होते. पावसाचा जोर वाढत असल्याने प्रशासन पूर्ण रात्रभर परिस्थितीवर नियंत्रण ठेवून होते. प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसीलदार सुरेश काशीद, नगरपालिका मुख्याधिकारी महादेव रोडगे व पोलीस उपाधीक्षक निलेश तांबे यांचे पथक पूर्ण रात्रभर महाड परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. गुरुवारी सकाळपासून पावसाचा जोर ओसरल्याने नदीची पातळीदेखील खाली गेली आहे.

बुधवारच्या पावसामुळे महाड तालुक्यातील चांढवे खुर्द या गावांमध्ये दरड कोसळल्याने येथील ग्रामस्थांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले. दरम्यान या घटनेमध्ये कोणत्याही स्वरूपाची हानी घडली नाही. वादळी पावसामुळे महाड मार्गावरील तेलंगे येथे तर रायगड छत्री निजामपूर मार्गावर मोठी झाडे कोसळल्याने येथील रस्ता बंद झाला होता. परंतु प्रशासन व स्थानिक नागरिकांकडून ही झाडे तात्काळ हटविण्यात आली. दरम्यान, महाड तालुक्यातील वराठी येथील सुरेश गोरीवले यांच्या घराचे पत्रे वाऱ्याने उडून गेल्याने त्यांच्या घराचे नुकसान झाले आहे. तसेच आमडोशी येथील राजाराम देवजी हिलम यांच्या घरकुलाचेही नुकसान झाले आहे. महाडमध्ये आत्तापर्यंत दहा घरांचे नुकसान झाले असून टकमकवाडी येथील पांडुरंग डावले यांच्या बैलाचादेखील अतिवृष्टीमध्ये मृत्यू झाला आहे.

सद्यस्थितीमध्ये महाड तालुक्यातील २५ गावांमध्ये सुमारे १०८८ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. या ठिकाणी प्रशासन व स्थानिक ग्रामपंचायतीकडून स्थलांतरीत नागरिकांना सुविधा दिल्या जात आहेत. पावसाचा जोर जरी ओसरला असला तरी महाडकारांना दोन वेळा पुराने हुलकावणी दिल्याने शहरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. व्यापारी तसेच नागरिकांनी आपले सामान व दुकानातील माल सुरक्षित स्थळीच ठेवून दिलेला आहे.



# नेरळजवळ विजेचे चार खांब कोसळले

**ढाकीचा माळ परिसरात तीन दिवसांपासून वीज गायब**

**कर्जत : बातमीदार**

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील ढाकीचा माळ या आदिवासीवाडीमधील विजेचे चार खांब कोसळले असून, गेल्या तीन दिवसांपासून तेथील वीजपुरवठा खंडित झाला आहे. दरम्यान, नेरळ परिसरातील वीजदेखील बुधवारी (दि. १३) रात्रीपासून खंडित झाली असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील ढाकीचा माळ ही लोकवस्ती डोंगराच्या पायथ्याशी असून तेथे नेरळ मोहचीवाडी येथून वीजपुरवठा करण्यात येतो. या परिसरात गेल्या काही दिवसांपासून जोरदार वाऱ्यासह पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यात ढाकीचा माळ येथे वीजवाहिन्या वाहून नेणारे चार खांब कोसळले आहेत. त्यातील एका लोखंडी खांबाने संपूर्ण रस्ता अडवून ठेवला आहे. त्यामुळे ढाकीचा माळ व परिसरातील तीन आदिवासी वाड्यांचा वीजपुरवठा गेल्या तीन दिवसांपासून खंडित झाला आहे.

ढाकीचा माळ या आदिवासी वाडीत जाण्यासाठी एक ओढा ओलांडावा लागतो. सध्या या ओढ्याला मोठ्या प्रमाणात पाणी असल्यामुळे या वाडीत जाऊन नवीन खांब उभे करण्यासाठी महावितरण अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. महावितरणचे नेरळ येथील शाखा अभियंता भोईर यांच्या पथकाकडून ढाकीचा माळ परिसरातील वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

# आसलवाडी येथील शाळा इमारतीवर झाड कोसळले

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील आसलवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीवर जुने झाड कोसळले. त्यामुळे शाळा इमारतीवरील पत्रे फुटले असून किचन खोलीचे मोठे नुकसान झाले आहे. तर पाण्याची टाकी मोडून गेली असून आता शाळेचे वर्ग समाज मंदिरात भरवण्याची वेळ येथील शिक्षकांवर येणार आहे.

आसल ग्रामपंचायत हद्दीतील दुर्गम भागात असलेल्या आसलवाडीमध्ये रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे या शाळेच्या पाठिमागे असलेले भले मोठे झाड कोसळले. त्यामुळे शाळेच्या इमारतीवरील अनेक सिमेंट पत्रे फुटले. तर किचन खोली पूर्णपणे कोलमडून गेली आहे. एक हजार लिटर क्षमतेची पाणीसाठवण टाकीदेखील कोसळली आहे. आता शाळेतील विद्यार्थ्यांना कुठे बसवायचे? असा प्रश्न मुख्याध्यापक समिर येरूणकर यांच्यासमोर उपस्थित झाला होता, मात्र ग्रामस्थांनी वाडीमधील समाजमंदिर विद्यार्थ्यांना बसण्यासाठी उपलब्ध करून दिले आहे. सतत सुरू असलेला पाऊस पाहता शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करणे कठीण झाले आहे. त्यामुळे आगामी काही दिवस शिक्षकांना शाळेचे वर्ग समाज मंदिरात भरवावे लागण्याची शक्यता आहे.





(छाया : संतोष पेरणे)

# मोरझोत धबधब्याचा रस्ता खचतोय



(छाया : शैलेश पालकर)




**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोरझोतचा धबधबा आणि थंड हवेचे कुडपण या दोन्ही ठिकाणी वर्षा पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी जाणे धोकादायक झाले आहे. मोरझोत धबधब्याचा रस्ता खचत असल्याची माहिती परिसरातील खोपड, चांदके आणि उमरठ येथील ग्रामस्थ देत असून, कुडपण खुर्दच्या रस्त्यावर मातीचे ढिगारे कोसळत असल्याने तेथील पर्यटन असुरक्षित झाले आहे.

पोलादपूर तालुक्यातील उमरठ ते चांदके या रस्त्यालगत असलेल्या मोरझोत धबधब्याकडे तरूणाईची विशेष गर्दी होत असते. गेल्या वर्षी आजुबाजूच्या डोंगरातून लालमातीचे ढिगारे कोसळल्याने हा धबधबा खुपच रूंदावला आहे. या वर्षीदेखील पर्यटकांना धबधब्याच्या जलधारांसोबत माती, दगडांचे ढिगारे कोसळण्याची भिती वाटत आहे. दरम्यान, या धबधब्याकडे जाणारा रस्ता खचत असल्याचे तसेच काही ठिकाणी रस्त्याला तडे पडल्याने या मार्गाने प्रवास करणे धोकादायक असल्याचे फलक लावण्यात आले आहेत.

पोलादपूर तालुक्यातील कुडपण खुर्द येथून कुडपण बुद्रुकपर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर मंगळवारी लगतच्या डोंगरातून मोठ्या प्रमाणात लालमाती कोसळली. ही दरड हटविण्यासाठी जेसीबीने काही तास काम करावे लागले. सध्या दरडी हटविण्यात आलेल्या ठिकाणचा रस्ता चिखलमय झाला असून दुचाकी आणि चारचाकी वाहने आणि पादचाऱ्यांना तेथून मंदगतीने वाटचाल करावी लागत आहे. त्यामुळे या परिसरात येणाऱ्या पर्यटकांची संख्याही रोडावली आहे.

## रेस्क्यू पथकामुळे वाचले मालकासह २० बकरी व श्वानाचे प्राण

**नागोठणे : प्रतिनिधी**

अंबा नदीला आलेल्या पुरात मंगळवारी (दि. १२) सायंकाळी नागोठणे जवळील चिकणी गावातील २० बकऱ्या व एका श्वानासह बकरी मालक अडकला होता. त्यांना वाचविण्याची कामगिरी पोलीस व रेस्क्यू पथकाने केली

मुसळधार पावसामुळे अंबा नदीने मंगळवारी सायंकाळी धोक्याची पातळी ओलांडली होती, त्यामुळे पुराचे पाणी नागोठणे शहरासह आजूबाजूच्या परिसरातील काही भागात शिरले व वाढू लागले. त्याच सुमारास नागोठणे पोलिसांना फोन आला की, चिकणी येथील हॉटेल गुलमोहरच्या मागील वाड्यात बकऱ्यांसह एक व्यक्ती पुराच्या पाण्यात अडकली आहे. पोलिसांनी तत्परतेने कोलाड येथील महेश सानप यांना याची कल्पना देताच त्यांनी तातडीने रेस्क्यू पथक पाठविले. या पथकातील जवान व पोलिसांनी घटनास्थळी जाऊन वेगात वाहणाऱ्या पाण्यातून बोटीने ६ ते ७ फेऱ्या मारून वाड्यातील बकरी मालक संतोष नेपाळी व त्याच्या २० बकऱ्या व एक श्वान या सर्वांना सुरक्षित ठिकाणी आणले.

रोह्याच्या तहसीलदार कविता जाधव व पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली रेस्क्यू पथकाचे रोशन सानप, हरेश सानप, पप्पू पवार, विकास नेगी, हवालदार विनोद पाटील, गणेश भोईर, पोलीस नाईक नितीश पाटील, नीलेश कोंडारे, पोलीस शिपाई सत्यवान पिंगळे यांनी ही धाडसी कामगिरी केली.

# अतिवृष्टीमुळे भात लावणी खोळंबली

**माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांपुढे निसर्गाचे संकट**



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

शेतात मोठ्या प्रमाणात पाणी असल्यामुळे माणगाव तालुक्यातील भात लावणीची कामे खोळंबली आहेत. त्यामुळे येथील शेतकऱ्यांसमोर नवे नैसर्गिक संकट शेतकऱ्यापुढे उभे राहिले आहे. तालुक्यात आतापर्यंत जेमतेम १२ टक्के लावणी झाली आहे.

माणगाव तालुक्यात २०६ गावे असून १२०२.१७ हेक्टर क्षेत्रावर भात पेरणी करण्यात आली आहे. यंदा ६२५२ हेक्टरवर भात लावणी होणार आहे. सध्या भाताची रोपे तयार झाली असून, शेतकरीही भात लावणीसाठी सज्ज झाला आहे. मात्र गेल्या आठ दिवसापासून माणगाव तालुक्यात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे खलाटीत पाणी साठले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना या ठिकाणी भात लागवड करता येत नाही. परिणामी भात लावणी खोळंबली आहे. ज्या ठिकाणी पावसाच्या पाण्याचा निचरा होत आहे, अशा शेतांमध्ये भात लावणी करण्यात येत आहे. माणगाव तालुक्यात आतापर्यंत १६२१ हेक्टर क्षेत्रावर म्हणजे सुमारे १२ टक्के लावणी झाली आहे. तर ८८ टक्के भात लावणी रखडली आहे.

पावसाची संततधार आणखी काही दिवस सुरू राहिल्यास शेतात तयार झालेली भाताची रोपे कुजण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तसे झाल्यास माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागणार नाही.

## माणगावातील अपघातात मगरीचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

नगरपंचायत हद्दीतील सुतार आळी भागात मुंबई-गोवा महामार्गावर गुरुवारी (दि.१४) सकाळी अज्ञात वाहनाची धडक बसून एका मगरीचा मृत्यू झाला.



माणगाव सुतारआळी भागात गुरुवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास एक मगर मुंबई-गोवा महामार्ग ओलांडून जात होती. त्यावेळी एका अज्ञात वाहनाची तिला धडक लागली. यामध्ये दुखापत होऊन काही अवधीत मगर मृत पावली. या घटनेची माहिती मिळताच माणगावचे वनक्षेत्रपाल अनिरुद्ध ढगे, वनरक्षक अक्षय मोरे, आदेश पोकळ, कल्पना गायकवाड, वैशाली मोरे, वनमजूर नथुराम म्हस्के यांनी त्वरित घटनास्थळी भेट देऊन मृत अवस्थेतील या मगरीला आपल्या वाहनातून शव विच्छेदनासाठी माणगाव पशु वैद्यकीय दवाखान्यात आणले. मृत मगर १.३० सेमी असून तिचे वजन २० किलो असल्याची माहिती वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी दिली.

## महिला विश्वचषक हॉकी स्पर्धा

# भारताचा जपानवर दणदणीत विजय

**तरासा (स्पेन) : वृत्तसंस्था**

नवनीत कौरने नोंदवलेल्या दोन गोलच्या बळावर भारतीय महिला हॉकी संघाने बुधवारी (दि. १३) विश्वचषक हॉकी स्पर्धेत जपानवर ३-१ असा विजय मिळवला आणि स्पर्धेची सांगता नवव्या क्रमांकानिशी केली. नवनीतने (३०व्या मिनिटाला, ४५व्या मि.) दोन मैदानी गोल केले, तर दीप ग्रेस एक्काने (३८व्या मि.) पेनल्टी कॉर्नरच्या साहाय्याने गोल करीत संघाच्या विजयात योगदान दिले. जपानकडून एकमात्र गोल यू असाइने (२०व्या मि.) केला.



सामन्याच्या पहिल्या सत्रापासून दोन्ही संघांमध्ये गोल करण्यासाठी चुरस पहायला मिळाली. भारताच्या वंदना कटारियाने जपानच्या गोलजळ्याच्या दिशेने चेंडू मारला, मात्र जपानच्या गोलरक्षकाने तो रोखला. दुसऱ्या सत्रातही जपानने आक्रमक खेळ केला. त्यांच्या असाइने गोल करीत संघाला आघाडी मिळवून दिली. भारताने जपानची ही आघाडी फार काळ टिकू दिली नाही. नवनीतने निर्णायक क्षणी गोल केल्याने मध्यांतराला सामना १-१ असा बरोबरीत आणला.

तिसऱ्या सत्रात भारताने जपानच्या बचावफळीवर दबाव निर्माण केला. या सत्रात संघाने दोन गोल झळाकवत ३-१ अशी आघाडी मिळवली. यानंतर भारताच्या बचावफळीने जपानला पुनरागमन करण्याची कोणतीच संधी दिली आणि आघाडी अखेरपर्यंत कायम ठेवत सामना जिंकला.

# सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत मिथुन, अश्मिताचा विजय



**सिंगापूर : वृत्तसंस्था**

भारतीय बॅडमिंटनपटू मिथुन मंजुनाथ आणि अश्मिता चलिहा यांनी सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत बुधवारी सनसनाटी विजयांची नोंद केली तर, अनुभवी पीव्ही सिंधू आणि एचएस प्रणॉय यांनीही दुसरी फेरी गाठली.

पुरुष एकेरीत मंजूनाथने पहिल्या फेरीतील सामन्यात जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील रौप्य पदक विजेत्या किदम्बी श्रीकांतवर २१-१७, १५-२१, २१-१८ असा विजय मिळवला. सामन्यात पहिला गेम जिंकत मंजुनाथने चांगली सुरुवात केली, मात्र दुसऱ्या गेममध्ये श्रीकांतने पुनरागमन करीत सामना बरोबरीत आणला. मग निर्णायक गेममध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये चुरस पाहायला मिळाली. अखेर मंजुनाथने निर्णायक क्षणी खेळ उंचावत सामना जिंकला. पुढच्या फेरीत मंजुनाथचा सामना आर्यलडच्या नहात गुएनशी होईल.


महिला एकेरीत अश्मिताने थायलंडच्या जागतिक क्रमवारीत १२व्या स्थानी असलेल्या बुसानन ओंगबाममरुंगफानला २१-१६, २१-११ असे सरळ गेममध्ये नमवले. सुरुवातीपासून अश्मिताने आक्रमक खेळ करीत बुसानन पुनरागमनाची कोणतीच संधी न देता विजय साकारला. अन्य लढतींत, दोन ऑलिम्पिक पदक विजेत्या सिंधूने पहिल्याच सामन्यात बेल्जियमच्या लिआने टॅनवर २१-१५, २१-११ असा सहज विजय साकारला. पुढच्या फेरीत तिची गाठ व्हिएतनामच्या थूय लिन्ह गुएनशी पडेल. लंडन ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या सायना नेहवालने भारताच्याच मालविका बनसोडचा २१-१८, २१-१४ असा पराभव करीत दुसऱ्या फेरीत धडक मारली.

गेल्या आठवड्यात मलेशियन मास्टर्स स्पर्धेची उपांत्य फेरी गाठणाऱ्या प्रणॉयने पुरुष एकेरीत थायलंडच्या सिथिकोम थम्मासिनला २१-१३, २१-१६ असे हरवले. त्याचा सामना आता तिसऱ्या मानांकित चोऊ टिएन चेनशी होणार आहे. पारुपल्ली कश्यपने इंडोनेशियाच्या पाचव्या मानांकित जोनाटन ख्रिस्टीकडून १४-२१, १५-२१ असा पराभव पत्करला, तर समीर वर्माने चीनच्या लि शि फेंगनेकडून १०-२१, १३-२१ अशी हार पत्करली. पूजा दांडू आणि आरती सारा सुनील यांनी महिला दुहेरीची दुसरी फेरी गाठली. चायनीज तैपेईच्या जोडीने माघार घेतल्याने त्यांना पुढे चाल मिळाली.

# वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी तृप्ती, आकांक्षाची निवड

**नाशिक : प्रतिनिधी**

मनमाडच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा रोवला असून, ताश्कंद (उझबेकिस्थान) येथे होणाऱ्या एशियन युथ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील पहिली आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तृप्ती पाराशर हिची सलग तिसऱ्यांदा व जागतिक युथ स्पर्धेतील रौप्य पदक विजेती





आकांक्षा व्यवहारे हिची सलग दुसऱ्यांदा भारतीय संघात निवड झाली आहे.

उझबेकिंस्थानमधील ताश्कंद शहरात १५ ते २६ जुलैदरम्यान या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मनमाडसारख्या छोट्या शहरातून आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रशिक्षक तृप्ती व आकांक्षाने नाशिक जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राचा नावलौकिक वाढविला आहे.

यशस्वी खेळाडूंना छत्रे विद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक प्रवीण व्यवहारे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# एआयएफएफच्या घटनेचा अंतिम मसुदा फिफाला सुपूर्द

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचा (एआयएफएफ) कारभार पाहणाऱ्या प्रशासकीय समितीने बुधवारी (दि. १३) संघटनेच्या घटनेचा अंतिम मसुदा फुटबॉलची जागतिक संस्था असलेल्या 'फिफा'ला सुपूर्द केला.

संघटनेच्या समितीने निर्धारित वेळेत निवडणुका न घेतल्याने सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केल्यानंतर फिफा व एएफसीच्या शिष्टमंडळाने नव्याने घटना तयार करण्यासाठी कालमर्यादा निश्चित केली. घटनेचा अंतिम मसुदा सात सदस्यीय समितीने राज्य संघटनांसमोर चर्चेसाठी ठेवला. या प्रकरणी पुढील सुनावणी २१ जुलैला होणार आहे.

# जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेत नीरजचे जागतिक पदकाचे लक्ष्य

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चालू हंगामात चमकदार कामगिरी करणाऱ्या ऑलिम्पिक विजेत्या नीरज चोप्राचे अमेरिकेच्या युजीन येथे शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत ऐतिहासिक पदक जिंकण्याचे लक्ष्य आहे.

२४ वर्षीय नीरजकडून पदक मिळवण्याच्या भारताला सर्वाधिक अपेक्षा आहेत. त्याची सध्याची लय पाहता या अपेक्षांची तो पूर्तता करू शकेल. ३० जूनला स्टॉकहोम डायमंड लीगमध्ये नीरजने ८९.९४ मीटर भाला फेकत हंगामातील तिसरी सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. नीरजने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पदक मिळवल्यास तो अशी कामगिरी करणारा केवळ दुसरा भारतीय आणि पहिला पुरुष ॲथलेटिक्सपटू ठरू शकतो. लांब उडीपटू अंजू बॉबी जॉर्जने पॅरिस येथे २००३मध्ये झालेल्या स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते. अंजू जागतिक पदक जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली होती. या स्पर्धेत नीरजसमोर ग्रेनाडाच्या ॲंडरसन पीटर्सचे आव्हान असेल. २०१९च्या



जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सोनेरी कामगिरी करणारा पीटर्स या वेळीही सुवर्णपदकासाठीचा प्रमुख दावेदार समजला जात आहे. या हंगामातील पाच सर्वोत्तम कामगिरींमध्ये चार पीटर्सच्या नावे आहेत. यात त्याच्या ९३.०७ मीटर कामगिरीचाही समावेश आहे. २०१७चा जागतिक विजेता जर्मनीचा जोहानेस वेटरने खांद्याच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून माघार घेतली आहे. नीरजने हंगामात दोन वेळा पावो नूर्मी आणि कुओर्टेन स्पर्धेत पीटर्सवर मात करत अनुक्रमे रौप्य आणि सुवर्णपदक जिंकले आहे. या वेळीही त्याच्याकडून याच कामगिरीच्या पुनरावृत्तीची अपेक्षा असणार आहे.

जागतिक अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सर्वोत्तम कामगिरी करण्याचा आपला मानस असल्याने नीरजने सांगितले. या स्पर्धेसाठी उत्तम तयारी केली आहे आणि माझा आत्मविश्वासही दुणावलेला आहे. मागील तिन्ही स्पर्धांत मी कामगिरीत सातत्य राखले आहे. स्टॉकहोम डायमंड लीगमध्ये ९० मीटर अंतराचा टप्पा गाठण्यासाठी मला अवघे सहा सेंटीमीटर अंतर कमी पडले. या वेळी सर्वोत्तम कामगिरीसाठी मी प्रयत्नशील आहे, असे नीरज म्हणाला.

# वेस्ट इंडिज मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा

## विराट कोहली, बुमराहला विश्रांती तर केएल राहुल आणि कुलदीप यादव यांचे पुनरागमन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने कॅरेबियन दौऱ्यावर होणाऱ्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी १८ सदस्यीय संघाची निवड केली आहे. रोहित शर्मा टी-२० मालिकेत संघाचा कर्णधार असेल, तर विराट कोहली आणि जसप्रित बुमराहला विश्रांती देण्यात आली आहे.




केएल राहुल आणि कुलदीप यादव यांने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन केले आहे, मात्र हे खेळाडू फिटनेस चाचणी उत्तीर्ण झाल्यानंतरच संघात पुनरागमन करू शकतील. त्याशिवाय आर. अश्विनने पुनरागमन केले आहे. या दौऱ्यासाठी विराट कोहलीला संघात स्थान मिळालेले नाही. त्याला एकदिवसीय संघातून विश्रांती देण्यात आली होती. बीसीसीआयने टी-२० मालिकेबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही. त्याच्याशिवाय जसप्रीत बुमराहलाही विश्रांती देण्यात आली आहे. कारण टीम इंडियाला ऑगस्टच्या शेवटी आशिया कप खेळायचा आहे. उमरान मलिकची सलग तीन मालिकांसाठी निवड करण्यात आली होती, ज्यामध्ये त्याला दोन संधी मिळाल्या, परंतु चौथ्या मालिकेत त्याला वगळण्यात आले आहे. याशिवाय ऋतुराज गायकवाड आणि संजू सॅमसन यांनाही वगळण्यात आले आहे.

**हा असेल भारतीय संघ :**
रोहित शर्मा, ईशान किशन, केएल राहुल, सूर्यकुमार यादव, दीपक हुड्डा, श्रेयस अय्यर, दिनेश कार्तिक, ऋषभ पंत, हार्दिक पांड्या, रविंद्र जडेजा, अक्षर पटेल, आर अश्विन, रवि बिश्नोई, कुलदीप यादव, भुवनेश्वर कुमार, अवेश खान, हर्षल पटेल आणि अर्शदीप सिंह.
*केएल राहुल आणि कुलदीप यादव यांचा समावेश फिटनेसवर अवलंबून आहे.

# लंडनच्या रस्त्यांवर आजी-माजी क्रिकेटपटूंची भटकंती

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. दोन्ही देशांमध्ये एक कसोटी सामना आणि तीन टी-२० सामन्यांची मालिका पार पडली. त्यानंतर, मंगळवार (दि. १२)पासून तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरू झाली आहे. या दरम्यान, भारतीय संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीदेखील लंडनमध्ये आहे. त्याने आपली एक खास गँग तयारी केली आहे. या गँगमध्ये पार्थिव पटेल आणि ऋषभ पंत यांचा समावेश आहे.



भारताचा माजी यष्टिरक्षक पार्थिव पटेलने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये महेंद्रसिंह धोनी आणि ऋषभ पंत यांच्यासोबत वेळ घालवतानाचा फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये तिघेही लंडनच्या रस्त्यांवर भटकंतीचा आनंद लुटताना दिसत आहेत. 'कीपर्स कॉर्नर' अशी टॅगलाईन देऊन पटेलने हा फोटो शेअर केला आहे.

भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी आपला वाढदिवस साजरा करण्यासाठी लंडनला गेला होता. तेव्हापासून तो तिथेच आहे. नुकत्याच पार पडलेल्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेत तो राफेल नदाल आणि सानिया मिर्झाचे सामने बघताना दिसला होता. त्याचे हे फोटो विम्बल्डनने आपल्या अधिकृत ट्विटर हँडलवर शेअर केले होते. त्यानंतर त्याने भारतीय संघाच्या टी २० आणि पहिल्या सामन्यालाही उपस्थिती दर्शवली.

# क्रिकेटमध्ये १२ जुलै ठरला डक डे

**इंग्लंड : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील १२ जुलैला झालेल्या पहिल्या वनडे सामन्यात भारताने इंग्लंडचा संपूर्ण संघ ११० धावात गुंडाळला होता. इंग्लंडचे तब्बल चार फलंदाज खातेही न उघडता डकवर बाद झाले. याच दिवशी आयर्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील सामन्यात देखील पाच फलंदाजांना भोपळाही फोडता आला नाही. त्यामुळे हा दिवस डक डे ठरला

भारत आणि इंग्लंड यांच्यातील सामन्यात जेसन रॉय, जो रूट, बेन स्टोक्स आणि लिम लिव्हिंगस्टोन शुन्यावर बाद झाले. दुसरीकडे १२ जुलैलाच आयर्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात आयर्लंडचे पॉल स्टर्लिंग, क्रेग यंग आणि सोशुआ लिटिल हे फलंदाज शुन्यावर बाद झाले. न्यूझीलंडचेही मार्टिन गप्टिल आणि विंग यंगदेखील शुन्यावर बाद झाले. त्यामुळे क्रिकेट इतिहासात आता १२ जुलै हा डक डे म्हणून साजरा करण्यास काही हरकत नाही.

## निमंत्रित जिल्हे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

# पुणे, मुंबई उपनगर यांना कुमार व कुमारी गटाचे जेतेपद





**औरंगाबाद : प्रतिनिधी**

औरंगाबाद येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाने आपल्या सुवर्ण महोत्सवानिमित्त निमंत्रित जिल्हे राज्यस्तीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत पुण्याने कुमार, तर मुंबई उपनगरने कुमारी गटात निमंत्रित जिल्हा राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेत पुण्याला संमिश्र यश मिळाले.

पुण्याचा पृथ्वीराज शिंदे कुमार, तर मुंबई उपनगरची हरप्रित संधू कुमारी गटात स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरले. दोन्ही खेळाडूंना प्रत्येकी रोख दोन हजार रुपये व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

गटाच्या अंतिम सामन्यात पुण्याने पालघरचा प्रतिकार ५१-३० असा मोडून काढत विजेते चषकावर आपले नाव कोरले. पालघरला उपविजेत्यावर समाधान मानावे लागले. कुमारी गटाच्या अंतिम सामन्यात मुंबई उपनगरने पुण्याला ३७-२० असे नमवित चषक आपल्या नावे केला. पुण्याला उपविजेत्या चषकावर समाधान मानावे लागले. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या कुमारी गटाच्या सामन्यात नांदेडने ठाण्याला ३१-३० असे चकवीत चषक व रोख रु. १५ हजार आपल्या खात्यात जमा केले. ठाण्याला चषक व रोख सात हजार रुपयांवर तृप्त व्हावे लागले.

कुमार गटात कोल्हापूरने नंदूरबारला ६६-४६ असे धुवून काढत तिसऱ्या क्रमांकाचा चषक व रोख २१ हजार रुपये आपल्या खिशात टाकले. नंदुरबारला चषक व रोख१५ हजार रुपयांवर संतुष्ट व्हावे लागले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com